लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०१९

महास्वच्छता अभियान : सलग २३ व्या रविवारी मोहीम; धूर व औषध फवारणी

# विद्यार्थ्यांनी गोळा केला १२० टन कचरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या महास्वच्छता अभियानामध्ये तेविसाव्या रविवारी शहरातील पंचगंगा नदीघाट, रंकाळा तसेच जयंती नाल्याच्या काठावर स्वच्छता केली. या अभियानात एक दिवसात १२० टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या वतीने पद्माराजे गार्डन येथे व यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल येथे स्वच्छता मोहीम राबविली. स्वरा फौंडेशनच्या वतीने रिलायन्स मॉलमागील परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उद्यान, पवडी, आरोग्य विभाग व गडकोट किल्ला संवर्धन समितीच्या वतीने बिंदू चौक येथील तटबंदीवरील झाडेझुडपे काढून तटबंदीची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता केल्यानंतर रोगराई पसरू नये यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी करून ब्लीचिंग पावडर टाकण्यात आली.

पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सहायक उद्यान अधीक्षक अर्पणा जाधव, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, केआयटी कॉलेजचे डायरेक्टर डॉ. व्ही. व्ही कार्जिन्नी, विभागप्रमुख मोहन चव्हाण, प्राध्यापक शीतल वरुर, व्ही. ए. स्वामी, गुरुप्रसाद चव्हाण, आदित्य आचरेकर, बाबा साळोखे, सचिन पाडव, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, आरोग्य निरीक्षक सुशांत कावडे, मनोज लोट, शुभांगी पोवार, माधवी मसूरकर, शिवाजी शिंदे, मुनीर फरास, अरविंद कांबळे, शिवाजी शिंदे, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, पारस ओसवाल, राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूलचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका व नागरिक उपस्थित होते.





कोल्हापूर महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून सुरु असलेल्या स्वच्छता मोहिमेत रविवारी जयंती नाला परिसरात स्वच्छता करण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात या मोहिमेत विद्यार्थ्यांनी हिरिरीने सहभाग नोंदविला.

### स्वच्छता मोहिमेची ठिकाणे

पंचगंगा नदीघाट परिसर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, टेंबलाई मंदिर, यल्लमा मंदिराचा परिसर, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, रिलायन्स मॉलमागे, फोर्ड कॉर्नर व पाचगाव परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

### ३०० विद्यार्थ्यांचा हातभार

विवेकानंद कॉलेज एनसीसी व एन.एस.एस.चे ५० व केआयटी कॉलेजचे २५ विद्यार्थी-विद्यार्थिनी, गोखले कॉलेज एनएनएस, एनसीसीचे ६० विद्यार्थी-विद्यार्थिनी, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजचे ६० विद्यार्थी-विद्यार्थिनी, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल व ॲग्रिकल्चर कॉलेजचे ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी, यशवंतराव चव्हाण कॉलेजचे ४० व स्वरा फौंडेशनचे १० कार्यकर्ते यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

केसरी
सोमवार, २ डिसेंबर २०१९

# आजारांवर मात करून आरोग्य चांगले राखा : डॉ. वैशाली राजे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वैयक्तिक व सामाजिक आरोग्य चांगले राहण्यासाठी निरनिराळ्या रोगांवर मात करुन आत्मविश्वासाने जगणे महत्त्वाचे असते, असे मत कृष्णा हॉस्पिटल, कराड येथील मेडिसीन विभागप्रमुख डॉ. वैशाली राजे यांनी विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना मांडले.

त्या पुढे म्हणाल्या, एक डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स निर्मूलन दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. एच.आय.व्ही. एड्ससारख्या दुर्धर रोगावर मात करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर जाणीव जागृती असणे आवश्यक असते. योग्य ती खबरदारी, सुरक्षा साधनांचा वापर,



**विवेकानंद कॉलेजमध्ये एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या वतीने जागतिक एड्स निर्मूलन दिनी काढण्यात आलेली रॅली.**

एच.आय.व्ही.ग्रस्त स्त्री पुरुषांना त्यांच्या मानवाधिकारापासून कोणी वंचित ठेवता कामा नये.

यानंतर उपस्थित एन.सी.सी. व एन.एस.एस. विद्यार्थ्यांना सुरेखा जाधव, समुपदेशक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी यांनी एच.आय.व्ही. एड्स जाणीव जागृतीची शपथ दिली. यानंतर छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सी.पी.आर.) येथून नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन यांच्यामार्फत आयोजित एड्स जाणीव जागृती रॅलीत महाविद्यालयातील एन.सी.सी. व एन.एस.एस. विद्यार्थी सहभागी झाले. या रॅलीचे उद्घाटन कोल्हापूर महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे हस्ते झाले. महाविद्यालयातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.सी.सी. विभाग प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले यांनी केल तर कार्यक्रमाचे आभार प्रा. लेफ्ट. जे. आर. भरमगोंडा यांनी मानले. या कार्यक्रमास विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमास जिमखाना विभाग प्रमुख प्रा किरण पाटील, एनएसएस विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. बी. एस. लाड, प्रा बी के गावीत, प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

केसरी

शनिवार
दि. १२ जानेवारी २०१९

# विवेकानंद कॉलेजमध्ये कापडी बॅग वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या निधीतून एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्यावतीने प्लास्टिक मुक्ती भारत अभियान अंतर्गत कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते पिशव्यांचे वाटप झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पाटील होते. यावेळी प्रा. हरताळे, प्रा. सदीप पाटील, डॉ. दीपक तुपे, प्रा.विकास म्हस्के, प्रा.गवळी, डॉ. माधवी चरणकर, डॉ. मंजुश्री घोरपडे आदी उपस्थित होते. आभार प्रा. कदम यांनी मानले. 1८

लोकमत कोल्हापूर, शनिवार, दि. २७ जुलै २०१९

# एनएसएस समाजप्रबोधनाचे माध्यम

## मल्लिनाथ कलशेट्टी : विवेकानंद महाविद्यालयात उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांवरील सुसंस्कारासाठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महत्त्वाची असते. त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव जागृत होण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी एनएसएस कार्यरत असते. समाजप्रबोधनाचे ते अत्यंत प्रभावी माध्यम आहे. सर्वांनी स्वच्छतेचा मंत्र स्वत: अंगिकारल्यास देश सुंदर होईल, असे प्रतिपादन महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी शुक्रवारी केले.

विवेकानंद महाविद्यालयातील एनएसएस विभागाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, एनएसएस केवळ गाव स्वच्छ करणारी यंत्रणा नसून, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारी चैतन्यदायी चळवळ आहे. प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, आजच्या युवकांसमोर नवनवीन आव्हाने येत आहेत. त्यांना सामोरे जाण्याची ताकद 'एनएसएस'मधून मिळते.



कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात एनएसएस विभागाच्या उद्घाटनप्रसंगी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी एच. पी. पाटील, एस. वाय. होनगेकर, बी. के गावित उपस्थित होते.

### श्रमसंस्कारांबरोबरच जगण्याचा मंत्र

श्रमसंस्कारांबरोबरच जगण्याचा मंत्र देण्याचे काम 'एनएसएस' करीत असते. ग्रामीण भागातील अंधश्रद्धा, अस्वच्छता, प्रदूषण, रोगराई, रोजगार, इत्यादी समस्या दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी 'एनएसएस'च्या माध्यमातून समाजप्रबोधन करावे, असे आवाहन डॉ. कलशेट्टी यांनी केले.

या कार्यक्रमात अनिकेत पाटील, गणेश यादव, आदित्य लातूरकर, निहाल मोमीन, समृद्धी माने या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. प्रवीण बागडे, मंजूश्री घोरपडे, एम. व्ही. चरणकर, पी. ए. पाटील, वाय. डी. हरताळे, अभिजित कदम, यू. डी. दबडे, प्रदीप पाटील, विकास मस्के, बी. के. गावित, आदी उपस्थित होते. प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. मानसी कांबळे आणि विश्वजित गवळी यांनी सूत्रसंचालन केले. संदीप पाटील यांनी आभार मानले.





कोल्हापुरातील स्वच्छता मोहिमेमध्ये आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थितीमध्ये जयंती नाला परिसरात वृक्षरोपण करण्यात आले, तर दुसऱ्या छायाचित्रात शहरातील स्वच्छता मोहिमेमध्ये महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग होता.

## १२ टन कचरा, प्लास्टिक उठाव : ज्येष्ठ नागरिक, महिलांसह विद्यार्थ्यांचाही सहभाग

# स्वच्छतेसाठी संघटना सरसावल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेला सर्व स्तरांतून प्रतिसाद मिळत आहे. रविवारी झालेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये शहरातील विविध सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला. दिवसभरामध्ये १२ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशन, परीट समाज- कोटीतीर्थ, ताराबाई गार्डन हास्य क्लब, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, व्हाईट आर्मी स्कूलचे विद्यार्थी, महापालिकेचे कर्मचारी सहभागी झाले होते.



कोल्हापूर महापालिकेकडून रविवारी महास्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी कोटीतीर्थ परिसराची स्वच्छता केली.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी महापालिकेत रुजू झाल्यापासून त्यांनी शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दर रविवारी मोहीम सुरु आहे. हा तेहतिसावा रविवार होता.

यावेळी आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, कनिष्ठ अभियंता आर. के. पाटील, लेखापाल बाबा साळोखे, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, उदय गायकवाड, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर उपस्थित होते.

### हा परिसर केला चकाचक

रंकाळा टॉवर ते फुलेवाडी फायर स्टेशन, कळंबा फिल्टर हाऊस ते मध्यवर्ती कारागृह, हॉकी स्टेडियम ते मोतीनगर रोड, रिलायन्स मॉलचा संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पंप, रंकाळा टॉवर ते फुलेवाडी फायर स्टेशन, शाहू नाका ते उड्डाणपूल, टेंबलाई नाका ते कावळा नाका, कोटीतीर्थ तलाव, डीएसपी ऑफिस ते भगवा चौक मेन रोड.

**महापालिकेची यंत्रणा** १५० महापालिकेचे कर्मचारी

| ३ | १३ | ६ |  | १५ | १ |
|---|---|---|---|---|---|
| जेसीबी | डंपर | आरसी गाड्या | | टिप्पर | पाणी टँकर |

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. २३ सप्टेंबर २०१९





महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून सुरु असलेल्या स्वच्छता मोहिमेत रविवारी पंचगंगा घाट येथे नदीतील निर्माल्यासह कचरा, प्लास्टिक बाहेर काढून प्रदूषणमुक्त करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. दुसऱ्या छायाचित्रात लक्ष्मीपुरीत संभाजी पूल, जयंती नाला परिसरातील कचरा हटविण्यात आला.

**स्वच्छता मोहीम :** गणेश विसर्जनानंतर घाटावर स्वच्छता; इतर ठिकाणीही मोहीम; १६० टन कचरा, निर्माल्य जमा

# पंचगंगा घाट झाला चकाचक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गणेश विसर्जनानंतर पंचगंगा नदीचे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून आज, बाविसाव्या रविवारी पंचगंगा नदी व घाट परिसरात महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून स्वच्छता मोहीम राबविली. याशिवाय शहरातील अनेक ठिकाणी ही मोहीम राबविली. यामध्ये सुमारे १६० टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेत महापालिका कर्मचाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

कोल्हापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करायची आहे, हा ध्यास मनात ठेवून ही महास्वच्छता मोहीम गेले २२ रविवार सुरू आहे. प्रत्येक महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सहभागी व्हावे, प्लास्टिकचा वापर करू नये व इतरांनाही करू देऊ नये, असे आवाहन करून आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छता मोहिमेतील सहभागाबद्दल सर्वांचे आभार मानले.

पंचगंगा नदीघाट येथे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेडच्या कागल येथील कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन रविवारच्या स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेकरिता आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त संजय सरनाईक, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहायक आयुक्त दिवाकर कारंडे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

यावेळी उपशहर अभियंता रमेश मस्कर, उपशहर रचनाकार नारायण भोसले, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सचिन जाधव, शिक्षण विभागाचे बाबा साळोखे, सचिन पांडव, नीलेश देसाई, अग्निशमन दलाचे जवान, आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, उदय गायकवाड, दिलीप देसाई, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे जनरल मॅनेजर धीरज जाधव, राजेंद्र काकडे, राहुल पवार, शरद आगेकर, गडकोट गिर्यारोहक अध्यक्ष नितीन देवेकर, विवेक सौंटे, मानवसेवा सेकंड इनिंग होम्सचे अध्यक्ष किशोर नैनवाणी, अर्जुन कांबळे, जयसिंग बलापुरे, स्नेहल कार्कर्ते, आदी मान्यवरांनी सहभाग नोंदविला.

## सामाजिक संस्थांचा सहभाग

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड, कागल येथील ६० कर्मचारी, विवेकानंद कॉलेजचे ३० विद्यार्थी-शिक्षक, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी)चे २० विद्यार्थी-शिक्षक, भारती विद्यापीठ लॉ कॉलेज ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी, गडकोट गिर्यारोहक १५ कार्यकर्ते, मानवसेवा सेकंड इनिंग होम्स १० व स्वरा फौंडेशनचे १५ कार्यकर्ते, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशन तसेच महापालिकेचे १५० कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

## स्वच्छता मोहीम राबविलेली ठिकाणे

पंचगंगा नदीघाट, गांधी मैदान, शाहू स्मृती गार्डन (जुना वाशी नाका), जयंती नाला संप पंप हाऊस, रिलायन्स मॉलमागे, फोर्ड कॉर्नर, ताराबाई गार्डन, कामगार चाळ, शिवाजी पूल व पाचगावच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

## औषध फवारणी, वृक्षारोपण

- स्वच्छता मोहिमेत तीन जेसीबी, आठ डंपर, ११ हायवा डंपर अशी यंत्रणा वापरण्यात आली.
- रोगराई पसरु नये यासाठी स्वच्छता केल्यानंतर धूर व औषध फवारणी करुन ब्लीचिंग पावडर टाकण्यात आली. याशिवाय रिलायन्स मॉलमागे वृक्षारोपण करण्यात आले.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०१९

**महापालिकेची स्वच्छता मोहीम :** अभियानात उत्स्फूर्तपणे लोकसहभाग; नाल्याच्या परिसरात वृक्षारोपण

# शहरातून ४५ डंपर कचरा उचलला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शहरातील महापूर उतरल्यानंतर पूरग्रस्त अद्याप सावरले नसले, तरीही त्यांचे संसार उभारण्यासाठी लगबग सुरू आहे. घरातील स्वच्छता करून रस्त्यावर टाकलेला कचरा, तसेच जयंती नाल्यातही कचरा रविवारी महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेत उचलण्यात आला. महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून सलग १८ व्या रविवारी ही मोहीम राबविली. स्वच्छता मोहिमेत सुमारे ४५ डंपर कचरा, गाळ, प्लास्टिक गोळा करण्यात आला. त्यानंतर जयंती नाल्याच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

स्वच्छता मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहा. आयुक्त संजय सरनाईक, नगरसचिव दिवाकर कारंडे, उपशहर अभियंता रमेश मस्कर, हर्षजित घाटगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले तसेच औषध फवारणी करण्यात आली.

आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, उदय गायकवाड, दिलीप देसाई, गीता हासूरकर, आरोग्य निरीक्षक शुभांगी पोवार, अरविंद कांबळे, सुशांत कांबळे, नंदू पाटील, श्रीराज होळकर, करण लाटवडे, शिवाजी शिंदे, मनोज लोट, मुनिर फरास व आरोग्य विभागाकडील २५० कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.





कोल्हापूर शहरातील महापूर ओसरल्यानंतर महापालिकेने लोकसहभागातून अवलंबिलेल्या महास्वच्छता मोहिमेत रविवारी शाहूपुरी कुंभार गल्लीत जयंती नाल्याच्या काठावर स्वच्छता करण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात लक्ष्मीपुरीत विल्सन पूल, संभाजी पूलनजीक नाल्यात अडकलेला कचरा काढण्यात आला.

## कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर

महापुरामध्ये काम केलेले महापालिकेचे आरोग्य, अग्निशमन विभागासह सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे रविवारी सकाळी केशवराव भोसले नाट्यगृह येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. पुणे येथील आरोग्य सेवा संघ व कोल्हापूर महानगरपालिका यांच्यावतीने आयोजित शिबिराचे उद्घाटन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुण्याचे डॉ. योगेश गाडेकर व त्यांच्या पथकांनी शिबिरात सहभाग घेतला.

## संप आणि पंप हाऊस परिसरात वृक्षारोपण

फक्त कचरा उठाव करून आयुक्त डॉ. कलशेट्टी थांबले नाहीत, तर त्यांनी विवेकानंद कॉलेज एन. एस. एस.चे विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासमवेत जयंती नाला परिसरातील संप आणि पंप हाऊस येथे वृक्षारोपण केले. स्वच्छता अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज एन. एस. एस.चे ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी, केएमसी कॉलेजचे २५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्ते, तसेच महापालिकेचे सुमारे ३०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## 'मावळा कोल्हापूर'कडून साहित्य

शहर स्वच्छता मोहिमेसाठी लागणारे निर्जंतुकरणासाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर, हॅन्डग्लोज, मास्क, खराटे, फिनेल बॉटल, आदी साहित्य 'मराठा कोल्हापूर' या संघटनेच्या वतीने देण्यात आले. हे साहित्य आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्याकडे देण्यात आले. यावेळी मावळा कोल्हापूरचे उमेश पोवार, अमोल गायकवाड, संदीप बोरगावकर, विनोद साळोखे, सोमनाथ माने, मयूर पाटील, ओंकार नलवडे उपस्थित होते

लोकमत कोल्हापूर, बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०१९

# एन.एस.एस.मुळे जीवनास गतिशीलता : गायकवाड

## विवेकानंदमध्ये एन.एस.एस. दिवस साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्वतंत्र भारतात ५० वर्षांपूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय सेवा योजना विभाग हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. जो कोणी या व्यासपीठावर येतो, तो कायमचा समाजाचा होतो. या व्यासपीठावरून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडते. व्यक्ती प्रगल्भ होते. त्याचे जीवन गतिशील होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ.डी.के.गायकवाड यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेला २४ सप्टेंबरला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सुवर्णमहोत्सवी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. एस. एम. रुईकर होते.

आदित्य लातूरकर, अनिकेत पाटील, ऐश्वर्या मोरे यांच्याह विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. एच. पी. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. मंजूश्री घोरपडे यांनी आभार मानले. अपूर्वा खांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास प्रा. संदीप पाटील, प्रा. बी. के. गावित, 'एन. एस.एस.'चे बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत
शुक्रवार, दि. १८ जानेवारी २०१९

# विवेकानंद कॉलेजमध्ये कापडी पिशव्यांचे वाटप

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. प्लास्टिकपासून होणारी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वतीने पिशव्यांचे वाटप प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकम्र अधिकारी प्रा. एच. पी. पाटील होते. प्लास्टिक व त्याचे दुष्परिणाम या विषयी डॉ. होनगेकर यांनी मार्गदर्शन केले. प्रा. वाय. डी. हरताळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. एस. कदम यांनी आभार मानले. डॉ. दीपक तुपे, प्रा. विकास मस्के, प्रा. पी. पी. गवळी आदी उपस्थित होते.

लोकमत कोल्हापूर, शनिवार, दि. २२ जून २०१९

## विवेकानंद महाविद्यालय

नागाळा पार्क येथील विवेकानंद महाविद्यालयात शुक्रवारी 'जागतिक योगदिना'निमित्त एन. सी. सी. व एन. एस. एस. विभागातर्फे सकाळी सात ते आठ या दरम्यान 'जागतिक योगदिन' साजरा करण्यात आला.

बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे एन. सी. सी. व एन. एस. एस.च्या ८० विद्यार्थी व कर्मचारी वर्गाने एकत्रितरीत्या योगासने व प्राणायाम केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी एन.सी.सी. कोल्हापूर विभागाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर आर. बी. डोग्रा, ५ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी.चे कोल्हापूर विभागाचे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर. बी. होला (सेना मेडल), कर्नल सांघा, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. एम. एम. कारंजकर व गोखले गुरुजी यांनी मार्गदर्शन केले. योगासनांची सांगता झाल्यानंतर कॉलेजच्या वतीने ताराबाई पार्क परिसरात रॅली काढण्यात आली.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. २४ जून २०१९

# विवेकानंद महाविद्यालयात योगदिन

कोल्हापूर : येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या एनसीसी व एनएसएस विभागांच्यावतीने 'जागतिक योग दिवस' साजरा करण्यात आला. उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी ब्रिगेडियर आर. बी. डोग्रा, कर्नल आर. बी. होला, कर्नल सांघा उपस्थित होते. दरम्यान, प्रा. डॉ. एम. एम. कारंजकर यांनी योगविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. तृप्ती कुंभारने आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, २९ जुलै २०१९

# स्वच्छतेसाठी घेतली शपथ

कोल्हापूर टाइम्स टीम



महापालिकेने रविवारी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये शहर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेताना सहभागी विद्यार्थी व कार्यकर्ते.

महापालिकेच्यावतीने रविवारच्या स्वच्छता मोहिमेला कॉलेजियन्स व सेवाभावी संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जयंती नाला, रंकाळा तलावासह अन्य ठिकाणी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये विविध कॉलेजांतील ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा डंपर कचऱ्याची उचल करण्यात आली. अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले.

करवीर पंचायत समिती कार्यालयात महावीर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शहर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेऊन मोहिमेला सुरुवात केली. पंचगंगा नदीजवळील गायकवाड बंगल्यानजीक महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. सिद्धार्थ नगर, जयंती नाला, रंकाळ्यासह शहरातील नाल्यांच्या पात्राजवळ स्वच्छता केली. सकाळी पाऊस असताना एनसीसी, एनएसएस विद्यार्थ्यांसह सेवाभावी संस्थांनी स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होत मोहिमेला बळकटी दिली. शहरातील महावीर, गोखले, केआयटी, न्यू पॉलिटेक्निक, विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेनंतर ठिकठिकाणी वृक्षारोपण केले. त्यांच्यासह स्वरा फाउंडेशन, नेशन फर्स्ट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वृक्षप्रेमी ग्रुप, राष्ट्र प्रथम फाउंडेशन, समस्त हिंदुत्ववादी संघटना, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, भारतीय किसान संघांचे अनेक कार्यकर्ते मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, 'प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून संगोपन करावे. एक ते १५ ऑगस्ट यांदरम्यान राबवण्यात येणाऱ्या स्वच्छता पंधरावड्यामध्ये सहभागी व्हावे.'

महावीर कॉलेजचे प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, गोखले कॉलेजचे प्राचार्य पी. डी. पाटील सहभागी होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । बुधवार, २८ ऑगस्ट २०१९

# विद्यार्थ्यांकडून स्वच्छता

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविली.

मोहिमे अंतर्गत स्वयंसेवकांनी खानविलकर पेट्रोल पंप परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय, रमणमळा, नाईक मळा, केव्हिज पार्क व व्हीनस कॉर्नर परिसरात स्वच्छतेचे काम केले. मोहिमेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र टाइम्स
गुरुवार, १ ऑगस्ट २०१९

# 'राष्ट्रीय सेवा योजना प्रभावी माध्यम'

**कोल्हापूर टाइम्स टीम**

'विद्यार्थ्यांवरील सुसंस्कारासाठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महत्वाची आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडविण्यासाठी एनएसएस प्रभावी माध्यम आहे' असे प्रतिपादन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस विभागाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. अनिकेत पाटील, गणेश यादव, आदित्य लातूरकर, निहाल मोमीन, समृध्दी माने यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. मानसी कांबळे व विश्वजित गवळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रविण बागडे, प्रा. डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. एम. व्ही. चरणकर आदी उपस्थित होते. प्र.

# एच. पी. पाटील यांना पुरस्कार



**कोल्हापूर** : क्रांतिसूर्य फाउंडेशनच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विवेकानंद कॉलेजचे भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांना प्रा. बाबूराव कदम यांच्याहस्ते देण्यात आला.

प्रा. पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयात रक्तदान शिबिर, एड्स जनजागृती, लेक वाचवा आदी विषयांवर जनजागृती, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करतात. महापुरावेळी न्यू पॅलेस परिसरातील ३०० पूरग्रस्तांना सुरक्षितस्थळी आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शाहूवाडीतील दुर्गम भागातील लोकांसाठी मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन केले. ॲनिमिया मुक्तीसाठी पाच गावे दत्तक घेऊन त्यांनी भरीव मदत दिली होती.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पाटील यांचे अभिनंदन केले. MT

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, १९ ऑगस्ट २०१९

# स्वच्छतेसाठी सरसावली प्राचार्य असोसिएशन

कोल्हापूर टाइम्स टीम

## एनएसएस, एनसीसी स्वयंसेवक देणार योगदान

शिवाजी विद्यापीठत प्राचार्य असोसिएशनतर्फे पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय झाला. पूरग्रस्त भागातील स्वच्छता मोहिमेत सर्वच कॉलेजमधील एनएसएस, एनसीसी विभागातील स्वयंसेवक ताकतीनिशी उतरतील अशी ग्वाही प्राचार्यांनी दिली. पूरग्रस्त भागात सुविधा निर्माण करण्यासाठी प्रशासनासोबत काम करतील असेही स्पष्ट केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कमला कॉलेजमध्ये असोसिएशनची सद्विचार सभा झाली. आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी उपस्थित होते.

आयुक्त कलशेट्टी म्हणाले, 'महापालिकेतर्फे गेली चार महिने प्रत्येक रविवारी स्वच्छता मोहीम सुरू आहे. यामध्ये कॉलेज युवकांचाही सहभाग आहे. कॉलेजतर्फे राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेला पालिका सहकार्य करेल.'



प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, 'कोल्हापुरातील महापुराचे पाणी ओसरले असले तरी सर्वत्र स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. शहर आणि परिसरातील स्वच्छता मोहिमेत सर्व कॉलेज सहभागी होतील.'

प्र-कुलगुरू शिर्के म्हणाले, 'विद्यापीठातर्फे चौदा कॉलेजमधील पथके पाठविली आहेत. स्वच्छतेचा आराखडा तयार केला आहे.'

प्राचार्य डॉ. सुरेश गवळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी आभार मानले. संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य प्रवीण चौगुले, प्राचार्य एस. वाय. होनगेकर, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्राचार्य पी. आर. शेवाळे, प्राचार्य राजेखान शानेदिवाण, प्राचार्य पी. के. पाटील आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, २३ सप्टेंबर २०१९

# शहरात १६० टन कचरा संकलित



महापालिकेच्या वतीने आयोजित स्वच्छता मोहिमेदरम्यान पंचगंगा घाटाची स्वच्छता करताना शहरवासीय.

**सहभागी संस्था कर्मचारी व विद्यार्थी**

| | |
|---|---|
| ६० किर्लोस्कर ऑईल इंजिन लिमिटेड कागल | १५ स्वरा फाउंडेशन |
| १५ गडकोट गिर्यारोहक | ३० विवेकानंद कॉलेज |
| १० मानवसेवा सेकंड इनिंग होम्स | २० केएमसी कॉलेज |
| | ३० भारती विद्यापीठ लॉ कॉलेज |

**म. टा. प्रतिनिधी,** कोल्हापूर

संततधार पावसात अखंडपणे सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेला पावसाने दिलेल्या उघडिपीमुळे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सलग २२ व्या रविवारी शेकडो शहरवासीयांनी मोहिमेत सहभागी होत तब्बल १६० टन कचरा व प्लास्टिक गोळा केले. कॉलेजीयन्स, स्वयंसेवी संस्था व कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचीही साथ मिळाली. त्यामुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचाही उत्साह दुणावला. स्वच्छतेला वृक्षारोपणाची जोड देण्यात आली.

सकाळी सात वाजता आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांनी उपस्थितांना स्वच्छतेंची शपथ दिल्यानंतर मोहिमेला सुरुवात झाली. पंचगंगा नदी, गांधी मैदान, शाहू स्मृती गार्डन, रंकाळा, राज कपूर पुतळा, जयंती नाला, फोर्ड कॉर्नर, ताराबाई गार्डन, शिवाजी पूल, पाचगाव, आदी परिसरात स्वच्छता करून तब्बल १६० टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. स्वच्छतेसाठी तीन जेसीबीचा वापर करण्यात आला. संकलित कचरा ११ डंपरमधून कसबा बावडा येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर टाकण्यात आला. स्वच्छतेनंतर लक्ष्मीपुरी येथे वृक्षारोपण करण्यात आले. 'लोकसहभागातूनच पंचगंगा प्रदूषणमुक्त करावयाची आहे. प्रदूषण रोखण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळा,' असे आवाहन कलशेट्टी यांनी केले.

यावेळी आर्किटेक्ट अँड इंजिनीअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, किर्लोस्करचे जनरल मॅनेंजर धीरज जाधव, राजेंद्र काकडे, राहुल पवार, शरद आगेकर, नितिन देवेकर, विवेक सोरटे, किशोर नैनवाणी, अर्जुन कांबळे, जयसिंग बलापुरे, स्नेहल काकते, उदय गायकवाड, दिलीप देसाई आदी उपस्थित होते.

मंदिर परिसर, कार हॉस्पिटल, उपशहर अभियंता रमेश मस्कर, नाट्यगृह पथ पुण पवार आरोग्य आरोग्य तपासणी शिबि

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, २६ ऑगस्ट २०१९

# पुरानंतर नाल्यांची स्वच्छता

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पूर ओसरल्यानंतर ठिकठिकाणांची स्वच्छता मोहीम हाती घेतल्यानंतर रविवारी महास्वच्छता अभियानांतर्गत जयंती नाला पात्राची स्वच्छता करण्यात आली. सलग १८ व्या रविवारी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभरात ४५ डंपर कचरा, गाळ उचल करण्यात आली. नाला पात्रात अडकलेले लाकडी ओंडके, प्लास्टिक कचरा दूर करण्यास महापालिका प्रशासनाला यश आले.

महापालिका प्रशासनाने महापुरानंतर शहरात आरोग्याच्या समस्या उद्भवू नयेत, त्यासाठी तातडीने, स्वच्छता मोहीम हाती घेतली. आरोग्य कर्मचाऱ्यांसह स्थानिक कार्यकर्त्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतल्याने पूरबाधित क्षेत्रातील स्वच्छता जवळपास संपुष्टात आली आहे. त्याठिकाणी अद्यापही धूर व औषध फवारणी सुरू असताना महास्वच्छता अभियानांतर्गत नालापात्रात स्वच्छता केली. सकाळी सात वाजता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते स्वच्छता



महास्वच्छता अभियानांतर्गत महापालिकेच्यावतीने जयंती नाला पात्रात स्वच्छता करण्यात आली.

## महास्वच्छतेच्या १८ व्या रविवारी उत्स्फूर्त प्रतिसाद

मोहिमेला सुरुवात झाली.

लक्ष्मीपुरी कामगार चाळ, मोकाशी पॅचेस, फोर्ड कॉर्नर, विल्सन पूल, जयंती नाला, पंचगंगा नदी घाट, सुतार वाडा, शाहूपुरी, गाडी अड्डा, रंकाळा तलाव परिसरात स्वच्छता केली. यावेळी विवेकानंद व केएमसी कॉलेजच्यावतीने जयंती नाला येथे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप पाटील, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, सहायक आयुक्त संजय सरनाईक, दिवाकर कारंडे, डॉ. विजय पाटील, उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण, उदय गायकवाड, दिलीप देसाई, गीता हासुरकर यांच्यासह आरोग्य विभागाचे २५० कर्मचारी सहभागी झाले होते. MT

15



महापालिकेच्यावतीने रविवारी शहरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी व नागरिक.

# विद्यार्थ्यांच्या सहभागाने स्वच्छता मोहिमेला बळ

कोल्हापूर टाइम्स टीम

महापालिकेने रविवारी राबविलेल्या स्वच्छता मोहिमेला शिक्षक, विद्यार्थ्यांचे बळ मिळाले. विविध प्रभागांत राबवलेल्या मोहिमेमध्ये २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आठ डंपर कचरा जमा केला. जयंती नाला, रंकाळा तलाव आणि महाविद्यालयांच्या परिसरांमध्ये मोहीम राबविली.

यावेळी वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांनी शहर स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली. विवेकानंद, न्यू, केआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसह सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोहिमेमध्ये सहभागी झाले होते. स्वच्छतेनंतर शहरात ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

सकाळी सात वाजता जयंती नाला पंप व संप परिसरात स्वच्छतेला सुरुवात झाली. लक्ष्मीपुरीतील रिलायन्स मॉलच्या पिछाडीस क्रिडाई, स्वरा फाउंडेशनने स्वच्छता करून वृक्षारोपण केले. न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रंकाळा उद्यानाची स्वच्छता केली. स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्राने कोटीतीर्थ तलाव परिसराची स्वच्छता करून ५० रोपे लावली. सुभाष रोडवर महापालिकेच्या वर्कशॉप परिसरात आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. त्यांच्या हस्ते वर्कशॉप परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. खासबाग मैदान व केएमटी बसस्थानक परिसरातही स्वच्छता करण्यात आली.

फुलेवाडीत वृक्षप्रेमी ग्रुपच्यावतीने १५० रोपे लावण्यात आली. नागोजीराव पाटणकर हायस्कूल व विकास विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दुधाळीत वृक्षारोपण केले. विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या वृक्षारोपण जनजागृतीपर चित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचा नगरसेवक प्रतापसिंह जाधव, शेखर कुसाळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव झाला.

स्वच्छता मोहिमेमध्ये नगरसेवक जयंत पाटील, संदीप कवाळे, ईश्वर परमार, उपायुक्त मंगेश शिंदे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. एम. एस. घोरपडे, डॉ. एच. पी. पाटील, कॅप्टन सुनीता भोसले, न्यू कॉलेजचे पी. एस. पाटील यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी सहभागी होते. MT

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । बुधवार, २८ ऑगस्ट २०१९

# विद्यार्थ्यांकडून स्वच्छता

**कोल्हापूर** : विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविली.

मोहिमे अंतर्गत स्वयंसेवकांनी खानविलकर पेट्रोल पंप परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय, रमणमळा, नाईक मळा, केव्हिज पार्क व व्हीनस कॉर्नर परिसरात स्वच्छतेचे काम केले. मोहिमेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, २ सप्टेंबर २०१९

# १२० टन कचरा, गाळाची उचल

## पालिकेच्या स्वच्छता मोहिमेत १२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शाहूपुरी कुंभार गल्ली परिसरात रविवारी स्वच्छता मोहीम राबविली.

गणरायाच्या आगमनाची सर्वत्र धामधूम सुरू असताना रविवारी महापालिकेच्या वतीने घेतलेल्या स्वच्छता मोहिमेत तब्बल १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सामाजिक कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी तब्बल १२० टन कचरा व गाळाची उचल केली. शाहूपुरी कुंभार गल्लीतील पुलावरील मोठ्याप्रमाणात गाळ काढून औषध फवारणी करण्यात आली.

महापालिका प्रशासनाच्या वतीने दर रविवारी स्वच्छता मोहीम घेतली जाते. सलग एकोणिसाव्या रविवारी गणरायाच्या आगमनानिमित्त शाहूपुरी कुंभार गल्लीमध्ये स्वच्छता घेण्यात आली. मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विवेकानंद, कॉमर्स व राजर्षी शाहू कॉलेजच्या एनसीसी व एनएसएसच्या १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर बचत गट व सामाजिक स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

सोमवारी गणेशमूर्ती नेण्यासाठी कुंभार गल्लीत भाविकांची गर्दी होणार असल्याने येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. त्यानंतर लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, फोर्ड कॉर्नर, विल्सन पूल, दसरा चौक, जयंती नाला, पंचगंगा घाट नदी परिसर, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल व कदमवाडी येथे मोहीम राबविली. गोळा केलेला कचरा प्रत्येकी दहा डंपर, ट्रॅक्टर ट्रॉली व ८१ टिपरमधून वाहतूक करण्यात आली. स्वच्छतेनंतर येथे धूर व औषध फवारणी करण्यात आली.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, सहायक आयुक्त संजय सरनाईक, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील, पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पवार यांच्यासह आरोग्य विभागाचे २०० कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स
शनिवार, ३ ऑगस्ट २०१९

# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

कोल्हापूर टाइम्स टीम

महापालिका अग्निशमन आणि आपत्ती व्यावस्थापन विभाग अंतर्गत गुरुवारी विवेकानंद कॉलेज व शाहू दयानंद कॉलेज येथे कार्यशाळा घेण्यात आल्या.

त्यामध्ये स्थानक अधिकारी मनीष रणभिसे यांनी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीविषयी माहिती दिली. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी नागरिकांना सुरक्षितरित्या अपघातस्थळापासून बाहेर काढणे, जखमी व्यक्तींवर प्रथमोपचार याबाबत माहिती देण्यात आली.यावेळी मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, ओंकार खेडकर, मधुकर जाधव, तानाजी वडर, सुनिल यादव, प्रमोद मोरे, सुनील वाईगडे व विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २४ जानेवारी २०१९

# 'कापडी पिशव्यांचा घरोघरी वापर व्हावा'

कोल्हापूर टाइम्स टीम

विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापकांच्या निधीतून एनसीसी व एनएसएस विभागाच्यावतीने प्लास्टिकमुक्ती भारत अभियानांतर्गत कापडी पिशव्यांचे मोफत वाटपाचा कार्यक्रम राबवण्यात आला. कापडी पिशव्यांच्या वापरातून घराघरात प्लास्टिकमुक्तीचा संदेश पोहचेल, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केली.

प्रा. एच. पी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य होनगेकर म्हणाले, 'पर्यावरणाच्यादृष्टीने या पिशव्यांचे महत्त्व मोठे आहे.



या माध्यमातून प्रबोधन होत असून होम सायन्सच्या विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांची शिलाई व छपाईचे प्रशिक्षणही मिळते.' प्रा. वाय. डी. हरताळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. एस. कदम यांनी आभार मानले. यावेळी डॉ. दीपक तुपे, प्रा. विकास मस्के, प्रा. पी. पी. गवळी, डॉ. माधवी चरणकर, डॉ. मंजुश्री घोरपडे उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, २४ ऑक्टोबर २०१९

# 'विवेकानंद'तर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्यावतीने कोल्हापूर, सांगली भागातील पूरग्रस्त विद्यार्थी व संस्थेतील पूरग्रस्त प्रशासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले.

पूरग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी संकलित केलेल्या ३ लाख ७१ हजार रूपयांच्या निधीतून, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते ही मदत देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

संकलित निधीपैकी ११२ पूरग्रस्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५०० रुपये व ११ प्रशासकीय कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये मदत वाटप करण्यात आली. शिवाजी कोकरे यांनी पालकांच्यावतीने मनोगत व्यक्त केले. प्रा. एस. एम. रुईकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. एस. लाड यांनी आभार मानले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी निवेदन केले.



विवेकानंद कॉलेजतर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदतीचे वाटप करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । शनिवार, २२ जून २०१९

## विवेकानंद कॉलेजमध्ये योगासने

एनसीसी व एनएसएस विभागाच्या वतीने शुक्रवारी सकाळी सात ते आठ या वेळेत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. कॉलेजच्या आवारातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनमध्ये एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रित प्राणायाम व योगासने केली. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी एनसीसी कोल्हापूर विभागाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडीयर आर. बी. डोग्रा, ५ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कोल्हापूर विभागाचे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर. बी. होला (सेना मेडल), ग्रुप हेडक्वार्टरचे ट्रेनिंग ऑफिसर कर्नल सांघा, अॅडम ऑफिसर कांबळीमठ व बटालियन जवान उपस्थित होते. प्रा. डॉ. एम. एम. कारंजकर यांनी योगासनांबाबत मार्गदर्शन केले.

महासत्ता
सोमवार, २२ जुलै २०१९

# विवेकांनद, केआयटी, न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा महास्वच्छता अभियानात सहभाग

**कोल्हापूर ता.२१ (प्रतिनिधी)–**

कोल्हापूर शहरामध्ये सकाळी ७ वाजल्यापासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदरच्या मोहिमेचा तेरावा रविवार असून या अभियानामध्ये विवेकांनद कॉलेज, न्यू कॉलेज, केआयटी कॉलेज, एन.सी.सी. व एन.एस.एस.चे विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षीका व विविध संघटनांनी सहभाग नोंदविला. यावेळी ८ डंपर कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेकरीता आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली उपआयुक्त मंगेश शिंदे, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, मुख्य आरोग्य निरिक्षक डॉ.विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

सकाळी संप व पंप हाऊस येथे स्वच्छतेची शपथ घेऊन आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते या स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी विवेकांनद कॉलेजच्या १५० विद्यार्थी, विद्यार्थीनीनी, एन.सी.सी. व एन.एस.एस.च्या विद्यार्थी, विद्यार्थीनीनी या मोहिमेत सहभाग नोंदवून या परिसराची स्वच्छता करुन वृक्षारोपण केले. तर कोरे हॉस्पीटलच्या मागे नाल्याच्या परिसराची न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता करुन त्याठिकाणी वृक्षारोपण केले. तसेच रिलायन्स मॉलच्या मागे नाल्याच्या परिसरात केआयटी कॉलेज, क्रिडाई व स्वरा फौंडेशनच्यावतीने स्वच्छता करुन वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी केआयटी कॉलेजचे २० विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. या मोहिमेअंतर्गत रंकाळा परिसराचीही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये न्यू कॉलेजच्या ४० विद्यार्थीनीनी रंकाळा तलाव परिसरातील उद्यानाची स्वच्छता केली. तसेच कोटीतीर्थ तलाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र यांच्यावतीने कोटीतीर्थ् तलाव परिसराची स्वच्छता करुन त्याठिकाणी मोठी ५० झाडे लावण्यात आली. तर दुधाळी येथे विकास विद्यामंदीर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे विद्यार्थी विद्यार्थीनी व स्थानिक नगरसेवक शेखर कुसाळे, प्रतापसिंह जाधव, घरफाळा विभाग यांच्या सहभागाने ५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात विकास विद्यामंदिर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे विद्यार्थी विद्यार्थीनी यांनी जनजागृती करता वृक्षारोपण या विषयावर चित्रांचे प्रर्दशन त्याठिकाणी आयोजीत केले होते. त्यामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थी विद्यार्थीनीचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

महासत्ता

शनिवार, ता. १४ सप्टेंबर २०१९

# कोल्हापुरात स्वच्छतेबाबत प्रबोधनात्मक रॅली

**कोल्हापूर, ता.१३(प्रतिनिधी)**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागाच्यावतीने ११ सप्टेबर २०१९ ते १ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत प्लास्टिक कचरामुक्त मोहिम (स्वच्छता हि सेवा २०१९) हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महानगरपालिका, शहाजी महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, के.आय.टी कॉलेज, महावीर कॉलेज, आर्किटेक्ट असोसिएशन, क्रिडाई यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रमुख मार्गावरुन प्लास्टीक व स्वच्छतेबाबत प्रबोधनात्मक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थितीत दसरा चौक येथून या रॅलीची सुरवात करण्यात आली.

हि रॅली दसरा चौक, आईसाहेब महाराज पुतळा, बिंदु चौक, शिवाजी चौक, महानगरपालिका, सी.पी.आर.चौक मार्गे दसरा चौक या प्रमुख मार्गावरुन काढण्यात आली. आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांनी कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना एक संकल्प करायला सांगितला.प्रत्येकाने किमान पाच लोकांना प्लास्टीक न वापरणेबाबत जागृत करा. त्यानंतर त्यांनी पुढे पाच लोकांना याबाबत जागृत करावे त्यामुळे आपले शहर नक्कीच प्लास्टीक मुक्त होईल. प्लास्टीक मुक्तीची सुरुवात महाविद्यालयापासून करुया. अनंत चतुर्दशी निमित्त सार्वजनिक गणेश मुर्तींचे विर्सजन होणार आहे. यावेळी हा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करुया प्लास्टिकचा वापर आपण टाळूया. महानगरपालिकेच्यावतीने प्लास्टीक विरोधी मोहिम सुरु असून येथून पुढे ही मोहिम अधिंक तीव्र करण्यात येणार असल्याचे आयुक्त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पर्यावरण अधिकारी समिर व्याघ्रांबरे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विजय पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, आर्किटेक्ट असोसिएशनचे अजय कोराणे, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, एकटी संस्था उपध्याक्ष संजय पाटील, अवनी जिल्हा प्रकल्प समन्वय जैनुद्दीन पन्हाळकर, शहाजी महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, के.आय.टी कॉलेज, महावीर कॉलेजचे एन.एस.एस. व एन.सी.सी.चे विध्यार्थी विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षिका, महापालिका आरोग्य कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

तरुण भारत ■ सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

# विवेकानंद कॉलेजच्या वतीने पथनाट्यातून आरोग्य जनजागृती

**कोल्हापूर :** नोबार्टिसा ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील औषध निर्माण क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी त्यांचा स्वतंत्र विभाग आरोग्य परिवार कार्यरत असून या विभागाच्या वतीने आरोग्य विषयक सामाजिक जाणीवा निर्माण व्हाव्यात म्हणून विविध उपक्रम राबविले जातात.

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डायरिया आजाराविषयी पथनाटयाच्या माध्यमातून वडणगे, निटवडे, आसूर्ले, पोर्ले या गावातील तीन हजार लोकांपर्यंत पोहोचून डायरियाबद्दलची शास्त्रीय माहिती, व्यक्तीगत जाणीव निर्माण करण्याचा संदेश दिला.

यावेळी प्रा. एच. पी. पाटील, प्रा. एस. एम. रुईकर, डॉ. डी. बी. पाटील , प्रा किरण पाटील . विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ
सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

# महास्वच्छतेतून १२० टन कचरा जमा

## २३ व्या रविवारी मोहीम; अनेक महाविद्यालये, स्वरा फाऊंडेशनचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा


**कोल्हापूर, ता. २९ : शहरात आज सलग २३ व्या रविवारी महास्वच्छता अभियान राबवून १२० टन कचरा व प्लास्टिक जमा केले. सकाळी ७ वाजल्यापासून हे अभियान राबविले. अभियानात विवेकानंद कॉलेज, केआयटी कॉलेज, गोखले कॉलेज, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल व ॲग्रीकल्चर कॉलेज, वायसी कॉलेज व स्वरा फाऊंडेशन यांनी सहभाग घेतला.**

या मोहिमेसाठी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

आज पंचगंगा नदीघाट परिसर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, टेंबलाई मंदिर, यल्लम्मा मंदिर परिसर, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, रिलायन्स मॉलमागे, फोर्ड कॉर्नर व पाचगाव परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली. डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजतर्फे पद्माराजे गार्डन येथे व यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल येथे स्वच्छता मोहीम राबवली.

स्वरा फाऊंडेशनतर्फे रिलायन्स मॉलमागील परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण केले. तसेच उद्यान, पवडी, आरोग्य विभाग व गडकोट किल्ला संवर्धन समितीतर्फे बिंदू चौक येथील तटबंदीवरील झाडेझुडपे काढून तटबंदीची स्वच्छता केली.

यावेळी पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सहायक उद्यान अधीक्षक अपर्णा जाधव, स्वरा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, डॉ. व्ही. व्ही. कार्जीनी, विभागप्रमुख मोहन चव्हाण, प्रा. शीतल वरूर, व्ही. ए. स्वामी, गुरुप्रसाद चव्हाण, आदित्य आचरेकर, बाबा साळोखे, सचिन पांडव, राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, सुशांत कावडे, मनोज लोट, शुभांगी पोवार, माधवी मसूरकर, शिवाजी शिंदे, मुनीर फरास, अरविंद कांबळे, शिवाजी शिंदे, इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, पारस ओसवाल आदींनी सहभाग नोंदविला.



**कोल्हापूर : शहरात सलग २३व्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत सहभागी नागरिक, विद्यार्थी आदी.**

### सहभागी विद्यार्थी असे

विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी : ५०, केआयटी कॉलेजचे विद्यार्थी : २५, गोखले कॉलेज एनएनएस, एनसीसीचे विद्यार्थी : ६०, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजचे ६०, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल व ॲग्रीकल्चर कॉलेजचे ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी, वायसी कॉलेजचे ४० व स्वरा फाऊंडेशनचे १० कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला.

### यंत्रणा अशी

मोहिमेत ५ जेसीबी, ५ डंपर, ११ आरसी गाड्या व महापालिकेच्या १५० सफाई कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने ही स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छतेनंतर रोगराई पसरू नये, यासाठी परिसरात धूर व औषध फवारणी केली, ब्लिचिंग पावडर टाकली.

पुण्य नगरी
सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

# स्वच्छता मोहिमेत १२० टन कचरा संकलन

## सलग २३ व्या रविवारीही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महास्वच्छता अभियानात सलग २३ व्या रविवारी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन शहरात विविध ठिकाणी स्वच्छता केली. यावेळी १२० टन कचरा आणि प्लास्टिक गोळा करण्यात आले.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी महापालिकेत आल्यापासून शहर स्वच्छतेसाठी मोहीम हाती घेतली. लोकसहभागातून दर रविवारी शहरात विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात येते. या अभियानास सलग २३ व्या रविवारीही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवारी (दि. २९) ही मोहीम पंचगंगा नदीघाट परिसर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, टेंबलाई मंदिर, यलम्मा मंदिर परिसर, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर व पाचगाव परिसर



कोल्हापूर : स्वच्छता करताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व मनपा अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी. (छाया : पांडुरंग पाटील)

या ठिकाणी राबविण्यात आली. डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या वतीने पद्माराजे गार्डन येथे, के. एम. सी. कॉलेजच्या वतीने राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल येथे स्वच्छता केली. स्वरा फौंडेशनच्या वतीने रिलायन्स मॉल मागील परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उद्यान, पवडी, आरोग्य विभाग व गडकोट किल्ला संवर्धन समितीच्या वतीने बिंदू चौक येथील तटबंदीवरील झाडे-झुडपे काढून तटबंदीची स्वच्छता करण्यात आली. यावेळी विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे ५०, केआयटी कॉलेजचे २५, गोखले कॉलेज एनएसएस, एनसीसीचे ६०, यशवंतराव चव्हाण (के.एम. सी) कॉलेजचे ६०, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल व ॲग्रीकल्चर कॉलेजचे ३०, वायसी कॉलेजचे ४० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यावेळी ५ जेसीबी, ५ डंपर, ११ आरसी गाड्या आणि महापालिकेच्या १५० सफाई कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने स्वच्छता, धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सहा. उद्यान अधीक्षक अर्पणा जाधव, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, केआयटी कॉलेजचे डायरेक्टर डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, विभागाप्रमुख मोहन चव्हाण, प्राध्यापक शीतल वरूर, व्ही. ए. स्वामी, गुरूप्रसाद चव्हाण, आदित्य आचरेकर, बाबा साळोखे, सचिन पांडव, राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, सुशांत कावडे, मनोज लोट, शुभांगी पोवार, माधवी मसूरकर, शिवाजी शिंदे, मुनीर फरास, अरविंद कांबळे, शिवाजी शिंदे, अजय कोराणे, पारस ओसवाल, राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूलचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व नागरिकांनी सहभाग नोंदवला.

तरुण भारत सोमवार, ३० सप्टेंबर २०१९

# विद्यार्थ्यांसह ज्येष्ठांनीही केली स्वच्छता मोहीम

## सलग तेवीसाव्या रविवारी महास्वच्छता अभियान , १२० टन कचरा उठाव, बिंदू चौकाचीही स्वच्छता

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी महास्वच्छता अभियान सुरु करुन शहर स्वच्छतेचा संकल्प केला आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सलग तेविसव्या रविवारी (दि.२७) स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी शेकडो विद्यार्थ्यांसोबत ज्येष्ठ नागरिकांनीही मोठया संख्येने सहभाग नोंदवला. १२० टन कचरा व प्लॅस्टिक गोळा करण्यात आले.




**महाविद्यालयीन युवकांसोबतच ज्येष्ठ नागरिकही स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले. दुसऱ्या छायाचित्रात नाल्यालगतची स्वच्छतेसाठी उपस्थित शेकडो विद्यार्थी.**

विवेकानंद कॉलेज, केआयटी कॉलेज, गोखले कॉलेज, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी) कॉलेज, डॉ. डी.वाय.पाटील मेडीकल व ॲग्रीकल्चर कॉलेज, वायसी कॉलेज व स्वरा फौंडेशन यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. तसेच यावेळी पर्यावरण अभियंता समिर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सहा.उद्यान अधिक्षक अर्पणा जाधव, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगांवकर, केआयटी कॉलेजचे डायरेक्टर डॉ.व्ही.व्ही कार्जीनी, विभाग प्रमुख मोहन चव्हाण, प्राध्यापक शितल वरुर, व्ही ए स्वामी, गुरुप्रसाद चव्हाण, कोऑडीनेटर आदित्य आचरेकर, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### महापालिकेची यंत्रणा

५ जेसीबी, ५ डंपर, ११ आरसी गाडया व महापालिकेच्या १५० सफाई कर्मचारी

### या परिसराची स्वच्छता

पंचगंगा नदीघाट परिसर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, टेंबलाई मंदीर, यलम्मा मंदीर परिसर, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर व पाचगाव परिरसर, पद्माराजे गार्डन, जिजाबाई गर्ल्स हायस्कूल

### ऐतिहासिक बिंदू चौकाची स्वच्छता

ऐतिहासिक बिंदू चौकातील तटबंदीवर झाडे-झुडपे वाढली आहेत. त्यामुळे उद्यान, पवडी, आरोग्य विभाग व गडकोट किल्ला संवर्धन समितीच्यावतीने बिंदू चौक येथील तटबंदीवरील झाडे झुडपे काढून तटबंदीची स्वच्छता करण्यात आली.

### स्वच्छतेसाठी उपस्थित टिम

विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी, केआयटी कॉलेजचे विद्यार्थी, गोखले कॉलेज एनएनएस, एनसीसीचे विद्यार्थी विद्यार्थीनी, (के.एम.सी) कॉलेजचे विद्यार्थी , डॉ. डी.वाय.पाटील मेडीकल व ॲग्रीकल्चर कॉलेजचे विद्यार्थी, वायसी कॉलेजचे व स्वरा फौंडेशन.

पुढारी कोल्हापूर, शुक्रवार, ४ ऑक्टोबर २०१९

**विवेकानंद महाविद्यालय**

- विवेकानंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रा. एस. एम. रुईकर होते. गांधीजींच्या विचारांचे अनुकरण करा, हीच गांधीजींना खऱ्या अर्थाने आदरांजली आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. स्वच्छ भारत अंतर्गत महाविद्यालयाच्या एन.सी.सी. व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक प्रा. समीक्षा फराकटे यांनी केली. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी आभार मानले.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, ७ ऑक्टोबर २०१९

# शहरात ३९ टन कचरा, प्लास्टिक जमा

## महास्वच्छता अभियान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरात महास्वच्छता अभियानात ३९ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. स्वच्छता मोहिमेचा २४ वा रविवार असून होता. विवेकानंद, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल, ॲग्रीकल्चर कॉलेज, राजश्री शाहू महाराज कृषी विद्यालय, स्वरा फाऊंडेशन, वृक्षप्रेमी व मॉर्निंग वॉकर्स ग्रुप यांनी मोहिमेत भाग घेतला. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, सहायक आयुक्त दिवाकर कारंडे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता आर. के.जाधव, पर्यावरण अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.



**कोल्हापूर : महापालिकेच्या वतीने रविवारी झालेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व इतर.** **(छाया : नाज ट्रेनर)**

बिंदू चौक येथे केएमटी कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ झाला. आयुक्त कलशेट्टी यांनी कोल्हापूर शहर व पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करायची आहे. त्यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. प्लास्टिकचा वापर करू नका, इतरानांही करू देऊ नका, असे सांगितले.

मोहिमेअंतर्गत टेंबलाई मंदिर येथे प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली. पंचगंगा नदीघाट परिसर, दसरा चौक, सर्व मुख्य रस्ते, हुतात्मा पार्क, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, मोती नगर ते शेंडा पार्क फुटपाथ, बिंदू चौक पार्किंग, टेंबलाई मंदिर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, रिलायन्स मॉल मागे, पद्माराजे गार्डन व पाचगाव परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

महापालिकेच्या २५० सफाई कर्मचाऱ्यांसह विद्यार्थीवर्गाच्या सहाय्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. संबंधित परिसरात धूर व औषध फवारणी करून ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली.

तरुण भारत सोमवार, ७ ऑक्टोबर २०१९

# शहरात सलग चोवीसाव्या रविवारी स्वच्छता

## ३९ टन कचरा उठाव, सामाजिक संस्था, संघटना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिकेच्या स्वच्छता अभियानात सामाजिक संघटना, संस्था, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून मोहीम सुरु असून प्रत्येक रविवारी परिसराची स्वच्छता केली जात आहे. चौवीसाव्या रविवारी दि. ६ रोजी तब्बल ३९ टन कचरा व प्लॅस्टिक गोळा करण्यात आला.

यावेळी विवेकानंद, डॉ.डी.वाय.पाटील मेडीकल, ॲग्रीकल्चर कॉलेज, राजश्री शाहू महाराज कृषी विद्यालय, स्वरा फौंडेशन, वृक्ष प्रेमी व मॉर्नींग वॉकर्स ग्रुप यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. बिंदू चौक येथे के.एम.टी कर्मचारी यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस सुरुवात झाली. या मोहिमेमध्ये टेंबलाई मंदिर येथे प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली.

आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, कोल्हापूर शहर, पंचगंगा नदी प्रदूषण मुक्त करावयाची आहे. त्यात सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे. तसेच प्लॅस्टिकचा वापर करु नये व इतरानांही करु देवू नये.



कोल्हापूर : महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी सामाजिक संघटना, मनपा अधिकारी, कर्मचारी.

### स्वच्छता केलेला परिसर

पंचगंगा नदीघाट परिसर, दसरा चौक सर्व मुख्य रस्ते, हुतात्मा पार्क, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, मोतीनगर ते शेंडा पार्क फुटपाथ, बिंदू चौक पार्किंग, टेंबलाई मंदीर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, रिलायन्स मॉल मागे, पद्माराजे गार्डन व पाचगाव परिरसर, पद्माराजे गार्डन, जयंती नाला मागील परिसर, बिंदू चौक . पार्किंग परिसर विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे १०, राजश्री शाहू महाराज कृषी विद्यालय ६०, डॉ.डी. वाय.पाटील मेडीकल ५०, ॲग्रीकल्चर कॉलेजचे ५० विद्यार्थी विद्यार्थीनी, शिक्षक शिक्षिका वृक्ष प्रेमी गृप ३० व स्वरा फौंडेशनचे १५ कार्यकर्ते मोहीमेमध्ये उपस्थित होते.

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, ७ ऑक्टोबर २०१९

# ३९ टन कचरा, प्लास्टिक झाले गोळा

## महास्वच्छता अभियान; चोविसाव्या रविवारी विविध संस्थांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ६ : शहरामध्ये आज झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये ३९ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेचा चोविसावा रविवार असून या स्वच्छताअभियानामध्ये विवेकानंद, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल, ॲग्रिकल्चर कॉलेज, राजर्षी शाहू महाराज कृषी विद्यालय, स्वरा फौंडेशन, वृक्षप्रेमी व मॉर्निंग वॉकर्स ग्रुप यांनी सहभाग नोंदविला.**



कोल्हापूर : शहरात आज सलग चोविसाव्या रविवारी महास्वछता अभियान राबविण्यात आले.

या मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.आयुक्त दिवाकर कारंडे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता आर. के. जाधव, पर्यावरण अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

यावेळी बिंदू चौक येथे के.एम.टी. कर्मचारी यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी या वेळी बोलताना आज चोविसावा रविवार आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली. त्यावेळी आपण सर्वांनी सहभाग घेतला. आपल्याला कोल्हापूर शहर, पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करावयाची आहे. त्यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. दर महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे प्लास्टिकचा वापर करू नका व इतरानांही करू देऊ नका असे सांगितले. या मोहिमेमध्ये टेंबलाई मंदिर येथे प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली.

ही मोहीम पंचगंगा नदीघाट परिसर, दसरा चौक, सर्व मुख्य रस्ते, हुतात्मा पार्क, जयंती नाला संप आणि पंप हाऊस, मोतीनगर ते शेंडा पार्क फुटपाथ, बिंदू चौक पार्किंग, टेंबलाई मंदिर, रंकाळा, शाहू स्मृती गार्डन, रिलायन्स मॉलमागे, पद्माराजे गार्डन व पाचगाव परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या वतीने पद्माराजे गार्डन येथे स्वच्छता मोहीम राबवली, वृक्षप्रेमी ग्रुप व स्वरा फौंडेशनच्या वतीने जयंती नाला मागील परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आरोग्य विभाग व के.एम.टी कर्मचारी यांनी बिंदू चौक पार्किंगची स्वच्छता केली. या वेळी विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे १०, राजर्षी शाहू महाराज कृषी विद्यालय ६०, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल ५०, ॲग्रिकल्चर कॉलेजचे ५० विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका वृक्षप्रेमी ग्रुप ३० व स्वरा फौंडेशनचे १५ कार्यकर्ते यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

यावेळी ५ जेसीबी, ५ डंपर महापालिकेच्या २५० सफाई कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता केल्यानंतर रोगराई पसरू नये यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली.

या वेळी पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, उपशहर रचनाकार नारायण भोसले, सहा.उद्यान अधीक्षक अपर्णा जाधव, प्राथमिक शिक्षण विभागाचे बाबा साळोखे, पर्यावरणवादी उदय गायकवाड, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, आरोग्य निरीक्षक शिवाजी शिंदे, करण लाटवडे, मनोज लोट, शुभांगी पोवार, महेश भोसले, नंदकुमार पाटील, मुनीर फरास, अरविंद कांबळे, सुशांत कांवडे, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, पारस ओसवाल, आरोग्य, के.एम.टी विभागाकडील कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका व नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०१९

पंचगंगा घाट, दसरा चौकात मोहीम : रस्तेही झाले चकाचक; विद्यार्थ्यांचा प्रामुख्याने सहभाग

# स्वच्छता अभियानात ३९ टन कचरा गोळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पंचगंगा नदीघाट परिसरासह दसरा चौक, आदी शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी महानगरपालिकेने लोकसहभागातून सलग २४ व्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविले. नेहमीप्रमाणे या अभियानात महापालिकेचे कर्मचारी, विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांसह सामाजिक संस्थांचा सहभाग वाखाणण्याजोगा होता. सकाळी राबविलेल्या या मोहिमेत सुमारे ३९ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

बिंदू चौक येथे के. एम. टी. कर्मचारी यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी, कोल्हापूर शहर, पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करावयाची आहे. त्यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. दर महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे. प्लास्टिकचा वापर करू नका व इतरांनाही करू देऊ नका, असे सांगितले. मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. आयुक्त दिवाकर कारंडे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता आर. के. जाधव, पर्यावरण अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. अभियानामध्ये विवेकानंद, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल, ॲग्रीकल्चर कॉलेज, राजर्षी शाहू महाराज कृषी विद्यालय, स्वरा फौंडेशन, वृक्षप्रेमी व मॉर्निंग वॉकर्स ग्रुप यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, उपशहर रचनाकार नारायण भोसले, सहा. उद्यान अधीक्षक अर्पणा जाधव, प्राथमिक शिक्षण विभागाचे बाबा साळोखे, पर्यावरणवादी उदय गायकवाड, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, आरोग्य निरीक्षक शिवाजी शिंदे, करण लाटवडे, मनोज लोट, शुभांगी पोवार, महेश भोसले, नंदकुमार पाटील, मुनीर फरास, अरविंद कांबळे, सुशांत कावडे, आर्क्टिटेक अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, पारस ओसवाल, आरोग्य, के. एम. टी.कडील कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



कोल्हापूर महापालिकेच्यावतीने लोकसहभागातून सलग २४ व्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी जयंती नाल्याच्या काठावर स्वच्छता करण्यात आली.

## कोणी, कोठे केली स्वच्छता

डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या वतीने पद्माराजे गार्डन येथे स्वच्छता मोहीम राबविली. वृक्षप्रेमी ग्रुप व स्वरा फौंडेशनच्या वतीने जयंती नाल्यामागील परिसर साफ करून वृक्षारोपण केले. आरोग्य विभाग व के. एम. टी. कर्मचाऱ्यांनी बिंदू चौक पार्किंगची स्वच्छता केली. यावेळी विवेकानंद कॉलेज एन. सी. सी. व एन. एस. एस.चे १० राजर्षी शाहू महाराज कृषी विद्यालय ६0, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल ५0, ॲग्रीकल्चर कॉलेजचे ५0 विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, वृक्षप्रेमी ग्रुप 30 व स्वरा फौंडेशनचे १५ कार्यकर्ते यांनी मोहिमेत सहभाग नोंदविला. टेंबलाई मंदिर येथे प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली.

### स्वच्छता मोहीम राबविलेली ठिकाणे

पंचगंगा नदीघाट परिसर, दसरा चौक सर्व मुख्य रस्ते, हुतात्मा पार्क, जयंती नाला, संप आणि पंप हाऊस, मोतीनगर ते शेंडा पार्क फुटपाथ, बिंदू चौक पार्किंग, टेंबलाई मंदिर, रंकाळा शाहू स्मृती गार्डन, रिलायन्स मॉल मागे, पद्माराजे गार्डन व पाचगाव परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

### औषध फवारणी

या अभियानासाठी पाच जेसीबी, पाच डंपर, महापालिकेचे २५0 सफाई कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने ही स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छता केल्यानंतर रोगराई पसरू नये, यासाठी परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लीचिंग पावडर टाकण्यात आली.

पुण्य नगरी

शनिवार, २७ जुलै २०१९

# एनएसएस समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम

## डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, विवेकानंदमध्ये एनएसएसचे उद्घाटन




कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस विभागाच्या उद्घाटन समारंभात बोलताना कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी. सोबत प्रा. एच. पी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आदी.

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांवरील सुसंस्कारासाठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महत्त्वाची असते. समाजप्रबोधनाचे एनएसएस अत्यंत प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस विभागाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी एनएसएस कार्यरत असते. ही केवळ गाव स्वच्छ करणारी यंत्रणा नसून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणारी चैतन्यदायी चळवळ आहे. या चळवळीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढणे गरजेचे आहे. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी महाविद्यालयाने एनएसएसद्वारे राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

यावेळी कॉलेज एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात एनएसएस योजनेचा प्रारंभ व कार्यपद्धती याबाबत माहिती दिली. यावेळी अनिकेत पाटील, गणेश यादव, आदित्य लातूरकर, निहाल मोमीन, समृद्धी माने या विद्यार्थ्यांनी मनोगत मांडले. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन मानसी कांबळे व विश्वजित गवळी यांनी केले.

यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण बागडे, डॉ मंजूश्री घोरपडे, प्रा. एम. व्ही. चरणकर, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. अभिजित कदम, प्रा. यू. डी. दबडे, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. विकास मस्के, ज्युनिअर कॉलेज एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. के. गावित व एनएसएसचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

पुण्य नगरी

शनिवार, २४ ऑगस्ट २०१९

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी राबविली स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

येथील विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी गेल्या १५ दिवसात शहरातील विविध भागात स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेंतर्गत स्वयंसेवकांनी खानविलकर पेट्रोलपंप परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय, रमणमळा, नाईक मळा, केव्हिज पार्क व व्हिनस कॉर्नर परिसरात स्वच्छतेचे काम केले.

महापूर येण्यापूर्वी महाविद्यालयात महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या वतीने एकदिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली होती. कोल्हापुरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत लोकांना मदत करताना या कार्यशाळेचा फायदा स्वयंसेवकांना झाला. विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी न्यू पॅलेस परिसरात अडकलेल्या सुमारे ३०० लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी मदत केली. स्वच्छता मोहिमेमध्ये आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, विवेकानंद कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

या मोहिमेसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर, रा. से. योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्वयंसेवकांनी व एन.सी.सी. छात्रांनी ही मोहीम पार पाडली. प्रा. पी. आर. बागडे, प्रा. संदीप पाटील, प्रा. बी. के. गावीत, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. ए. एस. कदम तसेच एनसीसीच्या कॅप्टन प्रा. सुनीता भोसले व प्रा. भरमगोंडा पाटील यांनी परिश्रम घेतले. १५

पुण्य नगरी ▌सोमवार, २३ सप्टेंबर २०१९

# महास्वच्छता मोहिमेत १६० टन कचरा जमा

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शहरामध्ये २२ व्या रविवारीही महास्वच्छता अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी १६० टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

पंचगंगा नदीघाट येथे किर्लोस्कर ऑईल इंजिन्सच्या कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. ही मोहीम गांधी मैदान, शाहू स्मृती गार्डन, रंकाळा राजकपूर पुतळा, जयंती नाला संप पंप हाऊस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, ताराबाई गार्डन कामगार चाळ, शिवाजी पूल व पाचगाव परिरसर या ठिकाणी राबविण्यात आली. रिलायन्स मॉल मागे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी किर्लोस्करचे ६० कर्मचारी, विवेकानंदचे ३०, केएमसीचे २०, भारती विद्यापीठ लॉ कॉलेजचे ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी, गडकोट गिर्यारोहक कार्यकर्ते, मानवसेवा सेकंड इनिंग होम्स, स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदवला. या मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली सहा. आयुक्त संजय सरनाईक, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहा. आयुक्त दिवाकर कारंडे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. तसेच ३ जेसीबी, ८ डंपर, ११ हायवा डंपर व महापालिकेच्या १५० सफाई कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने ही मोहीम राबविली. स्वच्छता केल्यानंतर रोगराई पसरू नये, यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली.

उपशहर अभियंता रमेश मस्कर, उपशहर रचनाकार नारायण भोसले, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, सचिन जाधव, शिक्षण विभागाचे बाबा साळोखे, सचिन पाडव, नीलेश देसाई, अग्निशमन दलाचे जवान, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, पर्यावरणवादी उदय गायकवाड, दिलीप देसाई, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, किर्लोस्करचे जनरल मॅनेजर धीरज जाधव, राजेंद्र काकडे, राहुल पवार, शरद आगेकर, गडकोट गिर्यारोहक अध्यक्ष नितनी देवेकर, विवेक सोरटे, मानवसेवा सेकंड इनिंग होम्स अध्यक्ष किशोर नैनवाणी, अर्जुन कांबळे, जयसिंग बलापुरे, स्नेहल काकते, विवेकानंद कॉलेजचे शिक्षक-शिक्षिका व नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. १५



कोल्हापूर : महास्वच्छता अभियानात सलग २२ व्या रविवारी शहरात स्वच्छता करताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह इतर. (छाया : एस . अली)

पुण्य नगरी ▪ सोमवार, २६ ऑगस्ट २०१९

# महास्वच्छता मोहिमेत ४५ डंपर कचरा उठाव

## पुरात काम केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** महापालिकेतर्फे सुरू असलेल्या महास्वच्छता अभियानास अठराव्या रविवारीही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मोहिमेत ४५ डंपर कचरा, गाळ उठाव करण्यात आला. तसेच पुरात काम केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची आरोग्य शिबिरात तपासणी करण्यात आली.

शहरामध्ये सकाळी ७ वाजल्यापासून महास्वच्छता अभियानास सुरुवात झाली. लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, मोकाशी पॅचेस, रिलायन्स मॉलमागे, फोर्ड कॉर्नर, विल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट, नदी परिसर, कुंभार गल्ली, सुखसागर हॉटेल, शाहूपुरी, सुतारवाडा, गाडी अड्डा, जयंती नाला, सिद्धिविनायक मंदिर परिसर, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, रंकाळा तलाव या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. यावेळी संप आणि पंप येथे विवेकानंद कॉलेज एनएसएसच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींसमवेत आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी वृक्षारोपण केले. यामध्ये विवेकानंद कॉलेज एनएसएसचे ३० विद्यार्थी - विद्यार्थिनी, केएमसी कॉलेजचे २५ विद्यार्थी - विद्यार्थिनी, स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदवला. यावेळी ४५ डंपर कचरा, गाळ व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहा. आयुक्त संजय सरनाई, दिवाकर कारंडे, उपशहर अभियंता रमेश मस्कर, हर्षजित घाटगे, पशुवैद्यकीय अधिकरी डॉ. विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.



**कोल्हापूर : महापालिकेच्या महास्वच्छता अभियानात सहभागी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह मनपा अधिकारी, कर्मचारी, नागरिक, महाविद्यालयीन कर्मचारी.**

दरम्यान, केशवराव भोसले नाट्यगृह येथे पुणे येथील आरोग्य सेवा व सकाळ रिलिफ फंड विद्यमाने महापालिकेच्या आरोग्य, अग्निशमन विभागाच्या पुरामध्ये काम केलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा प्रारंभ आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पुण्याचे डॉ. योगेश गाडेकर व त्यांची टीम यांनी या शिबिरात सहभाग घेतला.

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, पर्यावरणचे उदय गायकवाड, दिलीप देसाई, गीता हासूरकर, आरोग्य निरीक्षक शुभांगी पोवार, अरविंद कांबळे, सुशांत कांबळे, नंदू पाटील, श्रीराज होळकर, करण लाटवडे, शिवाजी शिंदे, मनोज लोट, मुनीर फरास मुकादम व आरोग्य विभागाकडील २५० कर्मचारी व नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

पुण्य नगरी

शुक्रवार, २ ऑगस्ट २०१९

# आपत्ती व्यवस्थापनाबाबत कार्यशाळा

**कोल्हापूर** : महापालिका अग्निशमन आणि आपत्ती व्यावस्थापन विभागाने विवेकानंद आणि शाहू दयानंद कॉलेज येथे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित केली. यामध्ये स्थानक अधिकारी मनीष रणभिसे यांनी नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्तीविषयी माहिती दिली. यावेळी मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, ओंकार खेडकर, मधुकर जाधव, तानाजी वडर, सुनील यादव, प्रमोद मोरे, सुनील वाईंगडे, विवेकानंद, केएमसी, गोखले कॉलेजचे शिक्षक व एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी
बुधवार, २५ सप्टेंबर २०१९

# एनएसएसमुळे जीवनाला गतिशीलता

## डॉ. डी. के. गायकवाड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जो कोणी एनएसएसच्या व्यासपीठावर येतो तो कायमचा समाजाचा होतो. या व्यासपीठावरून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडते. व्यक्ती प्रगल्भ होतो. त्याचे जीवन गतिशील होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले. एनएसएसच्या स्थापनेला २४ सप्टेंबरला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने विवेकानंद कॉलेजच्या एनएसएसतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. गायकवाड म्हणाले, स्वतंत्र भारतात ५० वर्षांपूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. सामाजिक एकात्मता वाढीला लागावी म्हणून सदैव प्रयत्न एनएसएसकडून सुरू असतात. त्यामुळे युवकांनी एनएसएसमध्ये सहभाग घ्यावा.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. एम. रुईकर होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी एच. पी. पाटील यांनी केले. पी. आर. बागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आदित्य लातूरकर, अनिकेत पाटील, ऐश्वर्या मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी मानले. सूत्रसंचालन अपूर्वा खांडेकर हिने केले. कार्यक्रमास संदीप पाटील, बी. के. गावित आदी उपस्थित होते. १५

पुण्य नगरी
शनिवार, ७ सप्टेंबर २०१९




कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज येथे शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर.

# विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवतो तो शिक्षक

## – डॉ. बी. एम. हिर्डेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माणसाला माणसासारखे जगायला शिकवतो व विद्यार्थ्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवितो तो शिक्षक असतो, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, शिक्षकांच्या हृदयात आणि डोक्यात नेहमी विद्यार्थी असतो. विद्यार्थ्यांच्या आतला आवाज सतत तेवत ठेवण्याचे काम शिक्षक करीत असतो. विद्यार्थ्यांमध्ये अंतर्बाह्य बदल घडविण्याचे सामर्थ्य शिक्षकांत असते. शिक्षकच विद्यार्थ्यांना अनेक जीवन कौशल्य शिकवित असतो. त्यांचे अनुभव विश्व समृद्ध करत असतो. अशा गुरूंचा आदर-सन्मान प्रत्येक विद्यार्थ्याने ठेवला पाहिजे.

यावेळी ऋतुजा पाटोळे, साक्षी पाटील व तेजस गुरव या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. अभिजित कदम यांनी करून दिला. आभार प्रा. प्रवीण बागडे यांनी मानले. सूत्रसंचालन अपूर्वा खांडेकर हिने केले.

यावेळी प्रा. डॉ. पी. ए. पाटील, प्रा. डॉ. कविता तिवडे, प्रा. डॉ. एम. व्ही. चरणकर, डॉ. वाय. डी. हरताळे, डॉ. दीपक तुपे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, डॉ. शर्मिला घाडगे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. एस. एम. रुईकर, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. बी. के. गावित, प्रा. विकास मस्के, प्रा. यू. डी. दबडे, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुण्य नगरी

शुक्रवार, २० सप्टेंबर २०१९

# विवेकानंदच्या मूर्तिदान उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गेली १५ वर्षे गणेश मूर्तिदान व निर्माल्य गोळा करुन प्रदूषणविरहित पंचगंगा हा उपक्रम राबविला जात आहे. यावर्षी कसबा बावडा येथील घाटावर ही मूर्तिदान व निर्माल्य दान उपक्रम राबविण्यात आला, त्याला गणेश भक्तांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे, डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. सरिता शिंदे, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. बी. के. गावीत, प्रा. संदीप पाटील व एन. एस. एस. विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

पुण्य नगरी

# कापडी पिशव्यांमुळे पर्यावरणाचे संतुलन

## प्राचार्य डॉ. होनगेकर : विवेकानंद महाविद्यालयात कापडी पिशव्यांचे वाटप

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कापडी पिशव्यांच्या वापरामुळे घराघरांमध्ये प्लास्टिकमुक्तीचा संदेश पोहोचेल व पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल, असे मत विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थी व प्राध्यापकांच्या निधीतून एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या वतीने कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील होते.

प्लास्टिक विज्ञानाने दिलेला शाप आहे, कारण प्लास्टिक कचरा डीकंपोज होत नाही. त्यामुळे प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाची हानी होते. पर्यावरणाची होणारी हानी टाळण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थी व प्राध्यापकांच्या निधीतून एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या वतीने कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

प्रा. होनगेकर म्हणाले, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, त्यांना सामाजिक व पर्यावरण रक्षणाचे भान व्हावे म्हणून महाविद्यालयालयीन स्तरावर विविध उपक्रम राबिवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या पिशव्यांचे महत्त्व पर्यावरणाच्या दृष्टीने खूप आहे. ही पिशवी लोकांचे प्रबोधन करते. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक वाय. डी. हरताळे यांनी केले. यावेळी डॉ. दीपक तुपे, प्रा. विकास मस्के, प्रा. पी. पी. घोरपडे यांच्यासह एनसीसी छात्र उपस्थित होत्या.

पुढारी | बुधवार, २७ मार्च २०१९

# विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा सदिच्छा समारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अधिविभागाचा सदिच्छा समारंभ झाला. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एच. पी. पाटील होते. यावेळी प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. एम. ए. पीरजादे उपस्थित होते. राहुल दिंडे यांनी आभार मानले.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, २९ जुलै २०१९

# भर पावसात स्वच्छता मोहीम

## सहा डंपर काढला गाळ; १ ऑगस्टपासून स्वच्छता पंधरवडा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहरात रविवारी भर पावसात सामाजिक संस्था, शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत सहा डंपर कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थित पंचगंगा घाट परिसरात १५० रोपे लावण्यात आली.

सकाळी सात वाजता चौदाव्या महास्वच्छता अभियानास सुरुवात झाली. सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालय येथे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेची सुरुवात झाली. विवेकानंद कॉलेज, महावीर कॉलेज, गोखले कॉलेज, केआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

संप आणि पंप हाऊस येथे स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. रिलायन्स मॉलच्या मागे नाल्याच्या परिसरात स्वरा फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. येथे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल ५०० रुपये दंड करण्यात आला.



कोल्हापूर : शहरातील विविध सामाजिक संस्था व विद्यार्थ्यांनी रविवारच्या चौदाव्या महास्वच्छता अभियानात सहभाग नोंदवित सहा डंपर कचरा गोळा केला. ( छाया : नाज ट्रेनर)

### स्वच्छतेची जबाबदारी घ्यावी

प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. सिद्धार्थनगर परिसरातील जयंती नाल्याच्या परिसराची स्वच्छतेची जबाबदारी महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घ्यावी. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा मोहीम विद्यार्थ्यांनी राबवावी, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले आहे.

क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अ‍ॅन्ड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा. रवींद्र पाडवी, प्रा. डॉ.गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जयदिश इंगवले, प्राचार्य पी. डी. पाटील, प्रा. ए. एन. घचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरूर, दिलीप देसाई, उदय गायकवाड आदींसह या अभियानात विविध संघटनांनी सहभाग घेतला.



कोल्हापूर : महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या महास्वच्छता मोहिमेत रविवारी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह सहभागी विद्यार्थी.

# १८ व्या दिवशीही महास्वच्छता मोहीम

## ४५ डंपर कचरा, गाळ, प्लास्टिक जमा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहरात अठराव्या दिवशीही (रविवारी) सकाळी सातपासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात विवेकानंद कॉलेज एनएसएसचे ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी, केएमसी कॉलेजचे २५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व स्वरा फाऊंडेशनचे २० कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी ४५ डंपर कचरा, गाळ व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

या मोहिमेत आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहायक आयुक्त संजय सरनाईक, दिवाकर कारंडे, उपशहर अभियंता रमेश मस्कर, हर्षजित घाटगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले.

सकाळी लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, मोकाशी पॅचेस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, विल्सन पूल, दसरा चौक, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपुरी, सुतार वाडा, गाडी अड्डा, जयंती नाला, सिद्धिविनायक मंदिर परिसर, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, रंकाळा तलाव या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी विवेकानंद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी- विद्यार्थिनी यांच्यासमवेत आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी वृक्षारोपण केले.

दरम्यान, केशवराव भोसले नाट्यगृहात पुरामध्ये काम केलेल्या महापालिकेच्या आरोग्य, अग्निशमन विभागाच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. याचा प्रारंभ आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. योगेश गाडेकर व त्यांच्या टीमने शिबिरात सहभाग घेतला. यावेळी उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, उदय गायकवाड, दिलीप देसाई, गीता हासुरकर, आरोग्य निरीक्षक शुभांगी पोवार आदींसह आरोग्य विभागाकडील अडीचशे कर्मचारी व नागरिकांनी सहभाग नोंदविला.

पुढारी कोल्हापूर, शनिवार, २६ ऑक्टोबर २०१९

# 'विवेकानंद'ची पूरग्रस्त विद्यार्थी, कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय माणूसकी जपत पूरग्रस्तांच्या वेदनेमध्ये सहभागी झाले आहे. त्यांच्या संसाराची नव्याने सुरुवात करण्यासाठी हा निधी उपयोगी पडेल, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित पूरग्रस्त विद्यार्थी व कर्मचारी यांना आर्थिक मदत कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. याप्रसंगी ११२ विद्यार्थ्यांना व अकरा कर्मचाऱ्यांना निधीचे वाटप करण्यात आले.

# महास्वच्छतेत विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरात रविवारी सकाळी सात वाजल्यापासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेचा हा एकोणीसावा रविवार होता. या अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे १२५ विद्यार्थी विद्यार्थिनी, कॉमर्स कॉलेजचे ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी, राजर्षी शाहू कॉलेजचे एनसीसी, एनएसएसचे १०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी व स्वरा फाऊंडेशनचे २० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला

कोंडा ओळ व कदमवाडी येथे कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज व विवेकांनद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी विद्यार्थिनींना आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ दिली. मोहिमेत लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपुरी सहावी गल्ली, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, कदमवाडी या परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

यावेळी सहा जेसीबी, दहा डंपर व ट्रॅक्टर ट्रॉली, ८१ टिप्पर व महापालिकेच्या २०० सफाई कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने १२० टन कचरा व गाळाचा उठाव करण्यात आला. स्वच्छता केलेनंतर रोगराई पसरू नये, यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थितीत झालेल्या या मोहिमेत महापालिका व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.



**कोल्हापूर : महापालिकेतर्फे रविवारी शहरात स्वच्छता मोहीम झाली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.**

३/९/१९

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, २२ जुलै २०१९

# महास्वच्छता अभियानात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महापालिकेच्या पुढाकाराने सुरू असलेल्या महास्वच्छता अभियानात १३ व्या रविवारी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. सकाळी ७ वाजल्यापासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, केआयटी कॉलेज, एन.सी.सी. व एन.एस.एस.चे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व विविध संघटनांनी सहभाग नोंदविला. यावेळी आठ डंपर कचरा गोळा करण्यात आला.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे अधिकारी सहभागी झाले. स्वच्छतेची शपथ घेऊन मोहिमेस सुरुवात झाली. विवेकानंद कॉलेजच्या १५० विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण केले. तर कोरे हॉस्पिटलच्या मागे नाल्याच्या परिसराची न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून त्याठिकाणी वृक्षारोपण केले. तसेच रिलायन्स मॉलच्या मागे नाल्याच्या परिसरात केआयटी कॉलेज, क्रिडाई व स्वरा फौंडेशनच्यावतीने स्वच्छता करून वृक्षारोपण केले.

यावेळी केआयटी कॉलेजचे २० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



**कोल्हापूर : पालिकेच्या वतीने स्वच्छता अभियान संपूर्ण शहरात सुरू आहे. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते.**

न्यू कॉलेजच्या ४० विद्यार्थिनींनी रंकाळा तलाव परिसरातील उद्यानाची स्वच्छता केली. कोटितीर्थ तलाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र यांच्या वतीने कोटीतीर्थ तलाव परिसराची स्वच्छता करून त्याठिकाणी मोठी ५० झाडे लावण्यात आली. दुधाळी येथे विकास विद्यामंदिर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी ५० झाडे लावली.

विभागीय कार्यालय क्र.१ गांधी मैदान, विभागीय कार्यालय क्र.२ छ.शिवाजी मार्केट व आरोग्य विभाग सहभागी झाला. या कार्यक्रमात विकास विद्यामंदिर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी जनजागृती करता वृक्षारोपण या विषयावर चित्रांचे प्रदर्शन त्याठिकाणी आयोजित केले होते. त्यामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

पुढारी कोल्हापूर, रविवार, २३ जून २०१९

# जागतिक योग दिन

## विवेकानंद कॉलेज

योगामुळे वजनात घट होते. ताण-तणावापासून मुक्ती मिळते, मन शांत व प्रसन्न राहते व आरोग्य उत्तम बनते. त्यामुळेच निरोगी शरीर व मन प्रसन्न ठेवण्यासाठी योगासने व प्राणायाम आवश्यक आहे, असे प्रतिपादन विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी व एनएसएस विभागाच्या वतीने २१ जून रोजी सकाळी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनमध्ये एनएससी व एनएसएसच्या ८० विद्यार्थी व स्टाफने एकत्रितरीत्या योगासने व प्राणायाम केले.

सकाळ

सोमवार, २९ जुलै २०१९ २

# चौदाव्या रविवारी महास्वच्छतेला प्रतिसाद

## सहा डंपर कचरा जमा; विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, संघटनांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : शहरात सलग चौदाव्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात महावीर कॉलेज, न्यू पॉलिटेक्निक कॉलेज, केआयटी कॉलेज, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेजचे एन.सी.सी. व एन.एस.एस.चे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, पर्यावरणप्रेमी, अखिल भारतीय विद्यार्थी, नेचर फस्ट, जनसंयोग ग्रुप व विविध संघटनांनी सहभाग नोंदविला. यावेळी ६ डंपर कचरा व प्लास्टिक गोळा केले.**



**कोल्हापूर : महापालिकेतर्फे सलग चौदाव्या रविवारी स्वच्छता मोहीम राबविली.**

सिद्धार्थनगर परिसर, करवीर पंचायत समिती कार्यालयात सुरवात केली. महावीर कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभाग नोंदविला. तसेच महावीर उद्यान येथे गोखले कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी व के.आय.टी. कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून स्वच्छता केली. पंप आणि पंप हाऊस येथे विवेकानंद कॉलेज, स्वरा फौंडेशनतर्फे वृक्षारोपण केले.

पंचगंगा नदीजवळ गायकवाड यांच्या बंगल्याजवळील मंदिराच्या परिसरात महापौर माधवी गवंडी व आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. या वेळी नगरसेवक अजित ठाणेकर, संदीप देसाई, नेशन फर्स्ट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वृक्षप्रेम ग्रुप, राष्ट्र प्रथम फौंडेशन, हिंदुत्ववादी संघटना, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, भारतीय किसान संघाचे कार्यकर्ते सहभागी झाले.

आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना स्वच्छतेची शपथ दिली. शाळेच्या, महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लॅस्टिक पिशव्या, प्लॅस्टिक बाटल्या, रिकामे डबे असा सुका कचरा गोळा करून एक दिवस शाळेत, कॉलेजमध्ये अथवा महापालिकेतर्फे १६ ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या संकलन केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले. १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा विद्यार्थ्यांनी राबवावा, असे आवाहन केले. रिलायन्स मॉलमागे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल रोहित सलवळकर यांना रक्कम ५०० रुपये दंड केला.यावेळी नगरसेवक जय पटकारे, अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता रमेश मस्कर, डॉ. विजय पाटील, पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, नारायण भोसले, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. उमेश बागंदरे, प्रा.रवींद्र पाडवी, प्रा. डॉ. गोपाळ गावडे, प्रा. जावेद मिस्त्री, प्राचार्य व्ही. बी. शिंदे, संदीप घाटगे, एस. आय. शिरोळे, जयदीश इंगवले, प्राचार्य पी. डी. पाटील, प्रा. ए. एन. बचाटे, बी. एस. कांबळे, ए. एन. बसुगडे, आर. एन. बिसुरे, गुरुप्रसाद चव्हाण, शीतल वरुर, पंचगंगा घाट संवर्धनचे महेश कामत, आर. के. पाटील, महादेव फुलारी, राम काटकर, दिलीप देसाई, उदय गायकवाड, अजय कोराणे, क्रेडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, आर्ट ऑफ लिव्हिंगसह संघटनांनी सहभाग नोंदविला.

### १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा

डॉ. कलशेट्टी यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना स्वच्छतेची शपथ दिली. शाळेच्या, महाविद्यालयांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्लास्टिक, प्लास्टिक बाटल्या, रिकामे डबे असा सुका कचरा गोळा करून एक दिवस शाळेत, कॉलेजमध्ये अथवा महापालिकेतर्फे १६ ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या संकलन केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले. १ ते १५ ऑगस्टपर्यंत स्वच्छता पंधरवडा विद्यार्थ्यांनी राबवावा, असे आवाहन केले.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १७ ऑगस्ट २०१९ ७

# स्वच्छतेला महाविद्यालयीन युवकांचा हातभार

## शिवाजी विद्यापीठातर्फे शहरात मोहीम : १३ महाविद्यालयांतील स्वयंसेवकांचा सहभाग

**आर. के. नगर, ता. १६ : शहर परिसरात महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजपासून शहरात स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला. दिवसभरात सुमारे १३ महाविद्यालयांच्या चमूने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली.**

विद्यापीठासह शहरातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे एक हजार स्वयंसेवकांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविली. लक्ष्मीपुरी येथे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. अमोल मिणचेकर, एनएसएस शहर समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेस औपचारिक प्रारंभ करण्यात आला. सुरवातीला स्वयंसेवकांना हातमोजे, मास्क, गमबूट तसेच अन्य स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लबच्या वतीनेही स्वयंसेवकांना टोप्या व स्वच्छता साहित्य देण्यात आले.

लक्ष्मीपुरी येथे रिलायन्स मॉलच्या परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. घरे, दुकानांसह रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखलाचे थर साचले आहेत. राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यूच्या स्वयंसेवकांनी हा सारा मलबा घरांतून, गल्ल्यांतून बाहेर काढून मुख्य रस्त्यापर्यंत आणण्यात आला. तुंबलेली गटारे मोकळी करण्याबरोबरच अन्य स्वच्छतेची कामे करण्यात आली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शहर परिसरात स्वच्छता करताना एनएसएसचे स्वयंसेवक.

राजाराम कॉलेज, कमला कॉलेज व न्यू कॉलेजच्या एनएसएस स्वयंसेवकांच्या व छात्रसैनिकांच्या वतीने तसेच किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कर्मचाऱ्यांतर्फे कुंभार गल्ली (शाहूपुरी) परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. आयुक्त मल्लीनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. व्ही.एम. चव्हाण यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. या वेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनीही भेट देऊन सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी केली व मोहिमेत सहभागी स्वयंसेवकांचे अभिनंदन केले.

स्वयंसेवकांनी हुतात्मा बाग परिसर (गोपाळकृष्ण गोखले कॉलेज), दसरा चौक परिसर (श्री शहाजी छत्रपती कॉलेज), न्यू पॅलेस परिसर (महावीर कॉलेज), सिद्धार्थनगर परिसर (नाईट कॉलेज व डी.आर.के. वाणिज्य कॉलेज), दुधाळी व पंचगंगा घाट परिसर (यशवंतराव चव्हाण कॉलेज), शुक्रवार पेठ परिसर (डी. डी. शिंदे कॉलेज), रमणमळा परिसर (विवेकानंद कॉलेज), बावडा परिसर (डॉ. डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), कदमवाडी परिसरात (राजर्षी शाहू कॉलेज) स्वच्छता केली.

### साहित्य वाटप..

सिद्धार्थनगर येथील काव्यांजली संजय कांबळे हिच्यासह अन्य बालकांना विद्यापीठातर्फे सिद्धार्थनगरातील समाज मंदिरात हे साहित्य वाटप करण्यात आले. काव्यांजलीला डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी शैक्षणिक साहित्य देण्याचा निश्चय केला.

सकाळ
सोमवार, २६ ऑगस्ट २०१९



कोल्हापूर : महास्वच्छता अभियानात सहभागी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी.

# महास्वच्छतेचा सलग अठरावा रविवार

कोल्हापूर, ता. २५ : शहरात आज सकाळी सातपासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. मोहिमेचा आजचा अठरावा रविवार असून, या अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज एनएसएसचे ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी, केएमसी कॉलेजचे २५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी ४५ डंपर कचरा, गाळ व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहायक आयुक्त संजय सरनाईक, दिवाकर कारंडे, उपशहर अभियंता रमेश मस्कर, हर्षजित घाटगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, मोकाशी पॅचेस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुखसागर हॉटेल, शाहूपुरी, सुतारवाडा, गाडी अड्डा, जयंती नाला सिद्धिविनायक मंदिर परिसर, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, रंकाळा तलाव या ठिकाणी ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सकाळ
सोमवार, २२ जुलै २०१९

# सलग तेराव्या रविवारी महास्वच्छता

## आठ डंपर कचरा जमा; महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक संस्थांचा प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर ता. २१ : सलग तेराव्या रविवारी महास्वच्छता अभियानात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, केआयटी कॉलेजच्या विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व विविध संघटनांनी यात सहभाग नोंदविला. यावेळी ८ डंपर कचरा गोळा केला.**

सकाळी संप व पंप हाऊस येथे स्वच्छतेची शपथ घेऊन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते स्वच्छतेला प्रारंभ झाला.

या वेळी विवेकानंद कॉलेजच्या १५० विद्यार्थी, विद्यार्थिनींनी, एनसीसी आणि एनएसएसच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी यात सहभाग घेत परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण केले. कोरे हॉस्पिटलच्या मागे नाल्याच्या परिसराची न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून वृक्षारोपण केले. रिलायन्स मॉलमागे नाला परिसरात केआयटी कॉलेज, क्रेडाई व स्वरा फौंडेशनतर्फे स्वच्छता करून वृक्षारोपण केले.

या मोहिमेअंतर्गत रंकाळा परिसराचीही स्वच्छता केली. यात न्यू कॉलेजच्या ४० विद्यार्थिनींनी रंकाळा परिसरातील उद्यानाची स्वच्छता केली.



कोल्हापूर : महापालिकेतर्फे शहरात सलग तेराव्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात सहभागी नागरिक, विद्यार्थी.

विभागीय कार्यालय क्रमांक १ गांधी मैदानतर्फे रंकाळा तलाव पूर्व बाजूकडील तलावातील केंदाळ व प्लास्टिक काढले. सुभाष रोड येथील महापालिकेच्या वर्कशॉपचीही स्वच्छता मोहीम मेस्त्री, ड्रायव्हर, हेल्पर व कर्मचाऱ्यांनी केली. खासबाग परिसराची विभागीय कार्यालय क्रमांक २ छत्रपती शिवाजी मार्केट व आरोग्य विभागातर्फे स्वच्छता केली.

वृक्षप्रेमी ग्रुपतर्फे फुलेवाडी येथे १५० झाडांचे वृक्षारोपण केले. दुधाळी येथे विकास विद्यामंदिर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे विद्यार्थी विद्यार्थिनी व नगरसेवक शेखर कुसाळे, प्रतापसिंह जाधव, घरफाळा विभाग यांच्या सहभागाने ५० झाडांचे वृक्षारोपण केले. यात विकास विद्यामंदिर, नागोजीराव पाटणकर हायस्कूलचे विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

या वेळी नगरसेवक जयंत पाटील, संदीप कवाळे, ईश्वर परमार, उपआयुक्त मंगेश शिंदे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. एम. एस. घोरपडे, डॉ. एच. पी. पाटील, कॅप्टन सुनीता भोसले, पी. आर. बागडे, पी. एस. पाटील, उपशहर अभियंता एस. के. माने, आर. के. जाधव, नगरसचिव दिवाकर कारंडे, कनिष्ठ अभियंता आर. के. पाटील, सुरेश पाटील, वर्कशॉप प्रमुख सचिन जाधव, स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्राचे अनिल मापसेकर, प्रशांत हडरकर, सिंधी समाजाचे अध्यक्ष दीपक हिराणी, दिलीप देसाई, उदय गायकवाड, अजय कोराणे, दिलीप पोवार, पारस ओसवाल, पवन जामदार, प्रतीक ओसवाल, विनायक फाळके, बाबा पार्टे व स्वामी समर्थ मंदिर बालसंस्कार केंद्राचे भक्त आदी उपस्थित होते.

तरुण भारत ■ सोमवार, २९ जुलै २०१९



कोल्हापूर : गोखले कॉलेज परिसरातील हुतात्मा पार्क येथे शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शहर स्वच्छतेची शपथ देताना आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी. सोबत उपस्थित मान्यवर.

# शहर स्वच्छतेचा चौदावा रविवार

- सिद्धार्थनगर, महावीर उद्यान परिसरात मोहीम
- गायकवाड वाड्याजवळ १५० वृक्षांचे रोपण
- मोहिमेत वाढतोय लोकसहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी शहर स्वच्छतेचा हाती घेतलेला वसा . गेल्या १४ आठवड्यांपासून अखंडित पण सुरु आहे. आजच्या चौदाव्या रविवारी शहरातील सिद्धार्थनगर, करवीर पंचायत समिती कार्यालय, महावीर उद्यान, गायकवाड वाडा, संप आणि पंप हाऊस आदी परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. मोहिमेत दिवसेंदिवस लोकसहभाग वाढत असून महावीर, गोखले, विवेकानंद, केआयटी, न्यू पॉलिटेक्निक आदी महाविद्यालयांमधील सुमारे ४०० हून अधिक विद्यार्थ्यांसह नेचर फस्ट, जनसंयोग ग्रुपच्या सदस्यांनी शहर स्वच्छतेत सहभाग नोंदवला. आयुक्तांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली.

करवीर पंचायत समिती कार्यालय परिसरात मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी महावीर महाविद्यालयाचे २०० हून अधिक एन. सी. सी. व एन. एस. एस.चे विद्यार्थी उपस्थित होते. महावीर उद्यान येथे गोखले कॉलेजचे १०० हून अधिक आणि केआयटी कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबवली. यावेळी एकूण सहा डंपर कचरा व प्लॅस्टीक संकलीत करण्यात आले.

यावेळी नगरसेवक जय पटकारे, रमेश मस्कर, डॉ. विजय पाटील, समीर व्याघ्रांबरे, नारायण भोसले, प्राचार्य आर. पी. लोखंडे, न्यू पॉलिटेक्निकचे प्राचार्य व्ही. बी. शिंदे, गोखलेचे प्राचार्य पी. डी. पाटील, गुरुप्रसाद चव्हाण, शितल वरुर, महेश कामत, आर. के.पाटील, अजय कोराणे, क्रीडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर आदींसह महापालिका आरोग्य विभागाचे ३०० हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते.

### गायकवाड वाडा परिसरात १५० वृक्षांचे रोपण

पंचगंगा नदीजवळील गायकवाड वाडा परिसरात महापौर माधवी गवंडी आणि आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात १५० वृक्षांचे रोपण झाले. यावेळी नगरसेवक अजित ठाणेकर, संदीप देसाई आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### पाचशे रुपये दंड

रिलायन्स मॉलच्या मागील बाजूस स्वरा फौंडेशनतर्फे स्वच्छता करण्यात आली. यावेळी येथे उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल रोहित सलवळकर याला महापालिकेतर्फे ५०० रुपये दंड करण्यात आला.

तरुण भारत ▪ सोमवार, २३ सप्टेंबर २०१९

# महास्वच्छता मोहिमेत १६० टन कचरा उठाव

## शहरात सलग २२ व्या रविवारी स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिका प्रशासन, सामाजिक संघटना, कॉलेजचे विद्यार्थी यांनी रविवारी महास्वच्छता अभियान राबविले. यावेळी १६० टन कचरा उठाव केला. सलग २२ व्या रविवारी स्वच्छता मोहीम करण्यात आली.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त संजय सरनाईक, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, सहायक आयुक्त दिवाकर कारंडे, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

दरम्यान, पंचगंगा नदी घाट येथे कागल किर्लोस्कर ऑईल इंजीन्स लिमिटेड कर्मचारी यांना स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेस प्रारंभ केला. यावेळी उपशहर अभियंता रमेश मस्कर, उपशहर रचनाकार नारायण भोसले, पर्यावरण अभियंता समिर व्याघ्रांबरे, आर. के. पाटील, सचिन जाधव, बाबा साळोखे, सचिन पाडव, निलेश देसाई यांनी सहभाग नोंदविला.

### अशी होती यंत्रणा

कागल किर्लोस्कर ऑईल इंजीन्स लिमिटेड कर्मचारी ६०, विवेकानंद ३०, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी) २०, भारती विद्यापीठ लॉ कॉलेज विद्यार्थी विद्यार्थीनी ३०, गडकोट गिर्यारोहक कार्यकर्ते १५, मानवसेवा सेकंड ईनिंग होम्स १० व स्वरा फौंडेशनचे १५ कार्यकर्ते, ३ जेसीबी, ८ डंपर, ११ हायवा डंपर व महापालिकेचे १५० सफाई कर्मचारी

### या परिसराची स्वच्छता

गांधी मैदान, शाहू स्मृती गार्डन, रंकाळा राजकपूर पुतळा, जयंती नाला संप पंप हाऊस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, ताराबाई गार्डन कामगार चाळ, शिवाजी पुल व पाचगाव परिसर.

तरुण भारत सोमवार, २६ ऑगस्ट २०१९

# महास्वच्छता अभियानात ४५ डंपर कचरा उठाव

## सलग १८ व्या रविवारी स्वच्छता मोहीम : पुरात काम केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर

प्रतिनिधी

कोल्हापूर

महापालिकेच्यावतीने पूर ओसरलेल्या परिसरासह रंकाळा तलाव येथे महास्वच्छता अभियान घेण्यात आले. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सलग १८ व्या रविवारी अखंड स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दिवसभरामध्ये ४५ डंपर कचरा, गाळ व प्लॅस्टिक गोळा करण्यात आले.

यावेळी विवेकानंदकॉलेज एनएसएसचे ३० विद्यार्थी, केएमसी कॉलेजचे २५ विद्यार्थी व स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्ते उपस्थित होते. रंकाळा तलाव या ठिकाणीही स्वच्छता करण्यात आली. तसेच संप आणि पंप येथे स्वछता करुन वृक्षारोपण केले. यावेळी शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, आरोग्यधिकारी डॉ.दिलीप पाटील, सहा. आयुक्त संजय सरनाईक, दिवाकर कारंडे, आरोग्याधिकारी डॉ.दिलीप पाटील, उपशहर अभियंता रमेश मस्कर, हर्षजीत घाटगे, पशुवैद्यकिय अधिकरी डॉ.विजय पाटील, उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पवार, पर्यावरणचे उदय गायकवाड, दिलीप देसाई यांच्यासह मनपाचे २५० कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.



कोल्हापूर : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समवेत नाल्या लगतच्या परिसराची स्वच्छता करताना महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी.

### स्वच्छ केलेला परिसर

लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, मोकाशी पॅचेस, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपुरी, सुतार वाडा, गांडी अड्डा, जयंती नाला सिध्दीविनायक मदीर परिसर, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर.

### पुरामध्ये काम केलेल्यांची आरोग्य तपासणी

महापालिकेच्या आरोग्य, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी पुरामध्ये काम केले होते. या सर्वांचे संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्‌घाटन आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पुण्याचे डॉ. योगेश गाडेकर व त्यांच्या टीमने रूग्णांची तपासणी केली.

तरुण भारत
सोमवार, २५ फेब्रुवारी २०१९

# एनएसएसमधून अष्टपैलू छात्र घडतो : प्राचार्य डॉ. होनगेकर

कोल्हापूर : एन.सी.सी छात्रांनी शिस्तप्रिय व कर्तव्यनिष्ठ असले पाहिजे. एन सी सी च्या माध्यमातून छात्रांना अनेक साहसी शिबिरात सहभागी होण्याची संधी प्राप्त होत असते त्यातून अनेक अनुभव येतात, यातूनच देशप्रेमी अष्टपैलू एन.सी.सी छात्र घडतो. असे मत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजच्या एन.सी.सी विभागाच्या वतीने आयोजित पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील होते. विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या २९ छात्रांचा सत्कार करण्यात आला. देवयानी जोशी हिचा दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनी संचालनात सहभागी झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. सुप्रिया संकपाळ हिने एन. सी. सी.च्या प्रगतीचा आढावा स्लाईड शो व्दारे घेतला. प्रास्ताविक कॅप्टन सुनीता भोसले यांनी केले. सूत्रसंचालन पियुष कुपटे व तृप्ती कुंभार यानी केले. आभार निकीता पाटील यांनी मानले.

119

तरुण भारत ▪ सोमवार, १४ जानेवारी २०१९

# विवेकानंद कॉलेजमध्ये कापडी पिशव्यांचे वाटप

## विद्यार्थी-प्राध्यापकांचा निधी खर्च : एनसीसी व एनएसएस विभागाचा उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्लास्टिक विज्ञानाने दिलेला शाप असून हा कचरा डिकंपोज होत नाही. त्यातून पर्यावरणाची हानी होते. हीच पर्यावरणाची होणारी हानी टाळण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांच्या निधीतून कापडी पिशव्या मोफत वाटप उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम एनसीसी व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आला होता.

समाजाला कापडी पिशव्यांचे महत्व समजण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. प्राचार्य डॉ.एस. वाय. होनगेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एच. पी. पाटील यांनी अध्यक्षीय भाषण केले.



या संस्थेतील होम सायन्स विभागाच्या विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांची शिलाई व छपाईचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे व श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. वाय. डी. हरताळे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.

आभार प्रा.ए.एस.कदम यांनी मानलें. यावेळी डॉ.दिपक तुपे, प्रा. विकास मस्के, प्रा. पी. पी. गवळी, डॉ. माधवी चरणकर, डॉ.मंजुश्री घोरपडे, एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

तरुण भारत ▪ गुरुवार, २६ सप्टेंबर २०१९

# 'एनएसएसमुळे विद्यार्थ्यांना प्रगल्भता येते'

**कोल्हापूर :** स्वतंत्र भारतात ५० वर्षापूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय सेवा योजना विभाग म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. जो कोणी या व्यासपीठावर येतो तो कायमचा समाजाचा होतो. या व्यासपीठावरुन प्रगल्भ व्यक्तिमत्व घडून, जीवन गतिशील होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा एस एम रुईकर होते. स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आदित्य लातूरकर, अनिकेत पाटील, ऐश्वर्या मोरे यांनी आपले विचार मांडले. प्रा डॉ मंजुश्री घोरपडे यांनी आभार मानले. अपूर्वा खांडेकर यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी प्रा संदीप पाटील, प्रा बी के गावीत, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुण भारत

शनिवार, २२ जून २०१९

## विवेकानंद कॉलेज

येथील विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी व एनएसएस विभागाच्यावतीने शिक्षणमहर्षी डॉ.साळुंखे स्मृतीभवनमध्ये सुमारे ८० विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी योगासने व प्राणायाम केली. योगासनाचे उद्‌घाटन शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी एनसीसी कोल्हापूर विभागाचे ग्रूप कमांडर ब्रिगेडीयर आर.बी.डोग्रा, कमांडिंग ऑफिसर कर्नल आर.बी.होला, ट्रेनिंग ऑफिसर कर्नल सांघा, ऑफिसर कांबळीमठ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी प्रमुख प्रा. कॅप्टन एस.एम.भोसले-दळवी, लेफटनंट प्रा. जे.आर भरमगोंडा, प्रा.एच.पी.पाटील, प्रा. बी.के.गावीत, प्रा.किरण पाटील, प्रा.एस. एम.रुईकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जे. आर भरमगोंडा यांनी तर तृप्ती कुंभार हिने आभार मानले.